


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड २, अंक १ | जानेवारी २०२१ (क्र.४)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** ३

वन्यजीवन – आतले ‘अधिक’ बाहेरचे

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य ४

दोन वर्षांत उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात १२ वाघांचा मृत्यू

उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील वृक्षतोड प्रकरणी नऊ सदस्यीय समिती

कन्हाळगाव अभयारण्य ५

वाघांच्या संख्येत संतुलन राखण्यासाठी कन्हाळगाव अभयारण्य उपयुक्त

कर्नाळा अभयारण्य ५

कर्नाळा अभयारण्यात पक्षीगणना

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य ५

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात वनस्पतीची नवी जाती

गौताळा औट्रमघाट अभयारण्य ६

गौताळा औट्रमघाट अभयारण्यात अतिक्रमणविरोधी कारवाई

चांदोली अभयारण्य ६

चांदोलीतील विस्थापितांच्या समस्यांच्या निराकरणासाठी शासनातर्फे शिबीर

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ६

गोंदिया-चंद्रपूर-बल्लारशा रेल्वेमार्गावर १२ वर्षांत ५०पेक्षा जास्त वन्यप्राणी ठार

ताडोबा अंधारीतील पाळीव हत्तींचे बोटेझरीत स्थलांतर

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात हवामान निरीक्षण मनोरा

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांना बेकायदा सफारीला नेणारे अटकेत

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ८

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पालगत वीजेचा धक्का लागल्यामुळे वाघाचा मृत्यू; तिघांना अटक

पेंच व्याघ्र प्रकल्प ८

पेंच व्याघ्र प्रकल्पात काळा बिबट्या

पेंच व्याघ्र प्रकल्पात अवैध मासेमारी करणाऱ्यांचा व्याघ्र संरक्षण दलाच्या जवानांवर हल्ला

राधानगरी अभयारण्य ९

राधानगरी अभयारण्याच्या पर्यटन विकासाला मंजुरी; प्रकल्पग्रस्तांसह पर्यावरण अभ्यासकांचाही विरोध

सागरेश्वर अभयारण्य १०

सागरेश्वर अभयारण्यात बिबट्याचे आगमन

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान १०

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात हिमालयातील गिधाड

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बिबट्याची गरोदर मादी वाहनाच्या धडकेत ठार

‘आरे वाचवा’ चळवळीतील आंदोलकांवरील गुन्हे अजूनही कायम

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या व्याघ्र विहारात वाघिणीचे आगमन

ज्ञानगंगा अभयारण्य ११

ज्ञानगंगा अभयारण्यात पहिल्यांदा गवा दिसला

ज्ञानगंगा अभयारण्याला इतर व्याघ्र अधिवासांशी जोडण्यासाठी वन्यजीव भ्रमणमार्गांची गरज

ज्ञानगंगा अभयारण्यात मृत बिबट्या; हद्दीबाबत वनाधिकाऱ्यांत संभ्रम

**राज्यस्तरीय बातम्या** १२

व्याघ्र प्रकल्पाबाहेरील वाघांच्या मृत्यूचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक

हरिहरेश्वरच्या किनारी ‘ऑलिव रिडले’ कासवाचे हंगामातील पहिले घरटे

पुणे शहरात एका महिन्यात तीन गवे; एकाचा मृत्यू

संवेदनशील वन्यजीव अधिवास प्रस्तावांच्या परीक्षणासाठी चार उपसमित्या

पँगोलीनच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र अभ्यासगट नेमणार

कोल्हापूर, सातारा व सिंधुदुर्गात संवर्धन राखीव क्षेत्रांना मंजुरी; राज्य वन्यजीव मंडळाचे इतरही निर्णय

चंद्रपूर-मूल वन्यजीव भ्रमणमार्गासाठी खबरदारीच्या उपाययोजनांचे भिजत घोंगडे

राज्यासाठी स्वतंत्र वन्यजीव धोरणाची राज्य वन्यजीव मंडळ सदस्याची मागणी

नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यांत दीर्घ काळानंतर माळढोक पक्ष्याचे दर्शन

**माणूस-बिबट्यासंबंधी वृत्त** १६

महाराष्ट्रात ११ महिन्यांत १७३ बिबट्यांचा मृत्यू

नेमक्या बिबट्याची ओळख पटणार नसल्यामुळे तीन बिबटे कायमचे बंदिस्त

माणूस-बिबट्या संघर्षाच्या घटनांत वाढ

माणूस-बिबट्या संघर्षविषयक संक्षिप्त वृत्त

**राष्ट्रीय बातम्या** १९

माळढोक वाचवण्यासाठी वीजवाहिन्या भूमिगत करण्याचा राष्ट्रीय हरित लवादाचा आदेश

वर्ष २०२० मध्ये भारतात १०५ वाघांचा मृत्यू

देशातील बिबट्यांच्या संख्येविषयीचा अहवाल प्रकाशित; महाराष्ट्रात १,६९० बिबटे

गिधाडांच्या संवर्धनासाठी उपग्रह अंकन

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २१

नेपाळ

नेपाळमध्ये समुद्रसपाटीपासून ३,००० मी उंचीवर पहिल्यांदाच वाघ दिसला

श्रीलंका

श्रीलंकेत जगातील सर्वाधिक हत्तीमृत्यू

**दृष्टीकोन** २४

संरक्षित क्षेत्राबाहेरील वने – संशोधन व वन्यजीव संरक्षण

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड २, अंक १, जानेवारी २०२१ (क्र. ४)**

संपादकः रेश्मा जठार

साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

साहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः Ashvini Menon Visual Design Studio

प्रकाशकः कल्पवृक्ष

संपादकीय पत्ताः C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

दूरभाष/फॅक्सः ०२० २५६५४२३९

**ई मेलः**marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळः** http://kalpavriksh.org

***

टीपः ‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**दुलीप मथथाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**

c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

***

## संपादकीय

### वन्यजीवन – आतले 'अधिक' बाहेरचे

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र' सुरू होऊन वर्ष होत आले. या वार्तापत्राची सुरुवात करताना साशंकता होती मराठी वृत्तांकनाबाबत; मराठी वृत्तपत्रांतून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्राविषयी पुरेशा बातम्या मिळतील का अशी. त्यातून मग इंग्रजीतील वार्तापत्र – 'प्रोटेक्टेड एरिआ अपडेट' हे द्वैमासिक असले तरी मराठी वार्तापत्र त्रैमासिक ठेवण्याचा निर्णय झाला.

पहिल्या वर्षातच लक्षात आले की मजकूर मिळेल का ही शंका एका परीने रास्त व दुसरीकडे फोल ठरली. फोल अशासाठी की गेल्या काही वर्षांत मराठी वृत्तपत्रांमध्ये वन्यजीवविषयक वृत्तांकनाचे प्रमाण वाढले आहे आणि रास्त अशासाठी की वृत्तांकनाचे प्रमाण वाढले असले तरी त्यात वैविध्य, विषयाची व्याप्ती, अभ्यासपूर्ण व विश्लेषणात्मक मजकूर अपवादानेच आढळतो. दुसरी बाब अशी की मराठी वृत्तपत्रांच्या संकेतस्थळांच्या तांत्रिक क्षमता-मर्यादा. पूर्वीपेक्षा अधिक वृत्तपत्रांची संकेतस्थळे आता उपलब्ध आहेत, हे खरे. मात्र, काही ठराविक वगळता मजकूर शोधणे सगळ्याच संकेतस्थळांवर तितकेसे सुलभ नाही.

उपरोल्लेखित दोन कारणांमुळे इंग्रजी वृत्तपत्रांतील काही बातम्यांचा संदर्भ या वार्तापत्रातील मजकुरासाठी घेतला जातो. तरीदेखील, पहिल्या खंडातील तीन अंकांमध्ये मिळून ८४ टक्के मजकूर हा मराठी व जेमतेम १६ टक्के मजकूर हा इंग्रजी बातम्यांवर आधारित आहे.

पहिल्याच वर्षात लक्षात आलेली आणखी एक बाब म्हणजे महाराष्ट्रातील वृत्तांकनात माणूस-वन्यजीव संघर्षविषयक बातम्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. या वृत्तांकनातून जाणवले की माणूस-वन्यजीव संघर्षाची व्याप्ती संरक्षित क्षेत्रांबाहेर, ग्रामीण, शहरी भागातील लोकवस्तीत पसरली आहे. 'व्याघ्र प्रकल्पाबाहेरील वाघांच्या मृत्यूचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक', 'पुणे शहरात एका महिन्यात तीन गवे; एकाचा मृत्यू', 'चंद्रपूर-मूल वन्यजीव भ्रमणमार्गासाठी खबरदारीच्या उपाययोजनांचे भिजत घोंगडे' या प्रस्तुत अंकातील बातम्या आणि पहिल्या तिन्ही अंकांतील 'माणूस-बिबट्यासंबंधी वृत्त' या अंतर्गत येणाऱ्या बातम्या राज्यातील माणूस-वन्यजीव संघर्षाच्या गांभीर्याची कल्पना देतात.

पहिल्या अंकासाठी तयारी करताना लक्षात आले की संरक्षित क्षेत्रातील घटना नसल्या तरी बिबट्याविषयक वृत्ताची संख्या लक्षवेधी होती. बिबट्या हा वन्यजीव संरक्षण कायद्याच्या अधिसूची एक मध्ये येणारा प्राणी; वाघाखालोखाल मोठा व मांसाहारी सस्तन प्राणी हे मुद्दे लक्षात घेऊन संरक्षित क्षेत्रांतील नसल्या तरी 'माणूस-बिबट्यासंबंधी वृत्ता'चा समावेश पहिल्या अंकात केला. हा भाग पुढच्या सगळ्या अंकांमध्ये कायम ठेवावा लागला, ही गंभीर बाब आहे.

भारतासारख्या उष्ण कटिबंधातील, दाट लोकवस्तीच्या प्रदेशात राजकीय, भौगोलिक सीमारेषा आखून वन्यजीवन आणि मानवी व्यवहारांना वेगवेगळे ठेवणे जवळपास अशक्य आहे. त्यामुळे संरक्षित क्षेत्रांबरोबरच कायद्याने संरक्षित न केलेल्या क्षेत्रातील अधिवास व त्याबाबतची धोरणे वन्यजीव संरक्षण-संवर्धनासाठी महत्त्वाची आहेत. याची जाणीव अलीकडच्या घटना वारंवार करून देत आहेत. या अंकापुरते पाहिल्यास 'ज्ञानगंगा अभयारण्यात पहिल्यांदा गवा दिसला', 'संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात हिमालयातील गिधाड', 'सागरेश्वर अभयारण्यात बिबट्याचे आगमन' या घटना वन्यप्राण्यांना एका संरक्षित क्षेत्रापासून दुसऱ्या संरक्षित क्षेत्रापर्यंत जाण्यासाठी पुरेसा अवकाश उपलब्ध असल्याने घडून आल्या, हे स्पष्ट आहे.

तेव्हा, हे वार्तापत्र संरक्षित क्षेत्रातील बातम्यांचा आढावा घेणारे असले तरी संरक्षित क्षेत्राबाहेरील वन्यजीवनाला यातून पूर्णपणे वगळणे अशक्यच आहे. या वार्तापत्राचे आहे तसेच, वन्यजीव संवर्धनविषयक धोरणाचे आहे. संरक्षित क्षेत्रात वन्यजीवन सुखेनैव नांदावे, असे वाटत असेल तर त्याला पोषक परिस्थिती संरक्षित नसलेल्या क्षेत्रातही गरजेची आहे, हे हळूहळू का होईना वृत्तांकनात येऊ लागले आहे, हेही नसे थोडके!

***

*स.न.वि.वि.*


*वन्यजीव संरक्षण-संवर्धन विषयक विचारांच्या देवाणघेवाणीसाठी महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्राचे व्यासपीठ वाचकांना उपलब्ध करून द्यायला आम्हाला अर्थातच आवडेल. तेव्हा, संपादकीय पत्त्यावर पत्र पाठवून किंवा ई-मेल करून आम्हाला तुमचे विचार जरूर कळवा. त्याचबरोबर, हे वार्तापत्र अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्हाला पर्याय सुचवा.*

*संपादक मंडळ*

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्य

**दोन वर्षांत उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात १२ वाघांचा मृत्यू**



उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात दोन वर्षांत सुमारे १२ वाघांचा मृत्यू झाला असून अनेक वाघ बेपत्ता झाले आहेत. या घटनांची दखल घेत वनमंत्र्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवाल मागितला आहे.

अभयारण्यात डिसेंबर २०२० अखेरीस गर्भवती वाघिणीचा मृत्यू झाला. यंदा एक जानेवारीला तीन बछड्यांसह वाघिणीचा मृत्यू झाला. त्यांच्यावर विषप्रयोग करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. सप्टेंबर २०२० मध्ये कुही वन्यजीव क्षेत्रात एक वाघ मृतावस्थेत आढळला. पवनी वनक्षेत्रातील चिचगाव बीटमध्ये दोन वाघांचा मृत्यू झाला. डिसेंबर २०१८ मध्ये पवनी वनक्षेत्रात एका वाघाचा मृत्यू झाला. अभयारण्यातून एप्रिल २०१६ मध्ये 'जय' हा वाघ बेपत्ता झाला. 'जय'चा बछडा 'जयचंद'च्या अस्तित्वावरील प्रश्नचिन्हही कायम आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि नागझिरा अभयारण्याच्या मध्ये हे अभयारण्य आहे. वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने या अभयारण्याला जोडणारे वन्यजीव भ्रमणमार्ग सुरक्षित नसून तिथे वीजवाहिन्यांचा धोका असल्याचे अहवालात सांगितले होते.

भ्रमणमार्ग, वीजप्रवाह, गवताळ प्रदेश, संरक्षण या चार गोष्टींवर अभयारण्य प्रशासनाने काम केलेले नाही. त्यामुळे इथे वाघ येतात, स्थिरावतात, पण माणूस-वन्यजीव संघर्षात त्यांचा मृत्यू होतो. तसेच, स्थानिकांचा विरोध असताना अभयारण्य जाहीर करण्याची घाई केल्याचा फटका या अभयारण्याला बसत आहे, अशी मते वृत्तात नोंदविली आहेत.

**सूत्र** – 'उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात दोन वर्षांत १२ वाघांचा मृत्यू', www.loksatta.com, ०३.०१.२०२१.

**उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील वृक्षतोड प्रकरणी नऊ सदस्यीय समिती**

उमरेड-पवनी-कऱ्हांडला वन्यजीव अभयारण्यातील वृक्षतोड व इतर बाबींच्या चौकशीसाठी वन विभागातील क्षेत्रीय व वन्यजीव अधिकाऱ्यांच्या नऊ सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीत पेंचचे विभागीय वनाधिकारी, नागपूरचे वन उपसंरक्षक, वन क्षेत्रपाल आणि वन सर्वेक्षकांचा समावेश आहे. ही समिती क्षेत्रीय व वन्यजीव अंतर्गत येणाऱ्या भूभागांच्या सीमा प्रत्यक्ष जमिनीवर तपासून त्यानुसार कायमस्वरुपी खांब उभारण्याचे काम करून घेईल.

नागपूर-नागभीड रेल्वेच्या कामासाठी क्षेत्रीय अंतर्गत येणाऱ्या भागातील २८० वृक्ष तोडण्याची परवानगी दिली असताना भूभागावरील सीमा धुसर असल्याचे निमित्त करीत अभयारण्यातील कक्ष क्रमांक १४३९ मधील ५०हून अधिक झाडे तोडण्यात आली. या प्रकरणी अद्याप कोणत्याही कर्मचारी वा अधिकाऱ्यावर कारवाई केली नसल्याचे नागपूर मंडळाच्या मुख्य वनसंरक्षकांनी सांगितले. समितीने आठवडाभरात अहवाल दिल्यानंतर त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

वृक्षतोड झालेला भाग हा वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने संशोधनांती घोषित केलेल्या वन्यजीव भ्रमणमार्गाचा भाग आहे. या भागात दक्षिण उमरेडच्या वन क्षेत्रपालांनी वन्यजीव अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय प्रकल्पासाठी वृक्षतोडीची परवानगी दिली. या पूर्वीही या क्षेत्रपालांनी याच प्रकल्पासाठी तितूर व शिवनी दरम्यानच्या वन्यजीव भ्रमणमार्गातील ३५०पेक्षा जास्त झाडे तोडण्याची परवानगी आवश्यक बाबींची पूर्तता केल्याशिवाय दिली होती.

**सूत्र** – विजय पिंजरकर. 'Panel to look into tree felling in Karhandla', www.timesofindia.indiatimes.com, ०८.१२.२०२०.



## कन्हाळगाव अभयारण्य

### वाघांच्या संख्येत संतुलन राखण्यासाठी कन्हाळगाव अभयारण्य उपयुक्त

राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत नव्याने घोषित झालेले कन्हाळगाव अभयारण्य ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरात वाघांची संख्या उत्तम राखण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल, अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्र वन विभाग आणि वाइल्डलाइफ कॉन्झर्व्हेशन ट्रस्ट (WCT) कन्हाळगाव जंगल क्षेत्रात सलग आठ वर्षे स्वयंचलित कॅमेरे वापरून करीत असलेल्या अभ्यासामुळे या भागातील वाघांच्या अस्तित्वाबद्दलची माहिती संकलित झाली आहे. कन्हाळगावमधील वाघ ताडोबा परिसरात जाऊन प्रजनन करत असल्याचे अभ्यासादरम्यान दिसून आले आहे, अशी माहिती WCT तील अभ्यासकांनी दिली.

आजवर संरक्षित वनक्षेत्राबाहेर असलेल्या या ३०० चौरस किमी प्रदेशात सुमारे १२ पूर्ण वाढ झालेले वाघ असल्याचे दिसून आले आहे. यापैकी २७० चौरस किमीच्या प्रदेशाला आता अभयारण्य म्हणून जाहीर करण्यात आले आहे.

वाघ कन्हाळगाव जंगलातून शेजारील तेलंगणामध्ये जात असल्याने तिथल्या संख्येतही वाढ होण्याची शक्यता आहे. याशिवाय, तेलंगणातील कावल आणि छत्तीसगडमधील इंद्रावती व्याघ्र प्रकल्प यांना जोडणाऱ्या भ्रमणमार्गाला या नव्या अभयारण्यामुळे कायदेशीर संरक्षण लाभले आहे.

**सूत्र** – मंदार मोरोने. 'ताडोब्याच्या पदरात कन्हाळगावचे वरदान!', maharashtratimes.com, ०९.१२.२०२०.

## कर्नाळा अभयारण्य

### कर्नाळा अभयारण्यात पक्षीगणना

महाराष्ट्र वन विभाग आणि 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट' यांनी एकत्र येऊन कर्नाळा अभयारण्यात डिसेंबर महिन्यात पक्षीगणना केली.

या पक्षीगणनेत निशाचर पक्ष्यांच्याही नोंदी केल्या गेल्या. गणनेमध्ये १०३ पक्ष्यांच्या जातींची नोंद करण्यात आली. ही गणना सर्वसामान्य पक्षिमित्रांसाठी खुली होती. मात्र, कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती लक्षात घेऊन फक्त महाराष्ट्रातील २७ हौशी पक्षीनिरीक्षकांना आधी नोंदणी करून आणि सुरक्षिततेची संपूर्ण खबरदारी घेऊन पक्षीगणनेत सहभागी करून घेण्यात आले.

या पक्षीगणनेच्या नोंदी ई-बर्ड (https://ebird.org/india/home) वर उपलब्ध आहेत.



**सूत्र** – संपदा जोशी. 'कर्नाळा अभयारण्यात पहिली पक्षीगणना', maharashtratimes.com, २७.१२.२०२०.

## कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य

### कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात वनस्पतीची नवी जाती

सह्याद्री पर्वतरांगेतील कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यासह रतनवाडीत 'विकोआ गोखलेई' ही वनस्पतीची नवी जाती आढळली आहे. विकोआ प्रजातीच्या चौदा जाती जगभरात असून त्यात आता या नव्या जातीची भर पडली आहे.

नाशिकमधील आरवायके महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. कुमार विनोद गोसावी, संशोधक विद्यार्थी नीलेश माधव, राजापूरच्या आबासाहेब मराठे कॉलेजमधील साहाय्यक प्राध्यापक डॉ. अरुण चांदोरे, त्र्यंबकेश्वरच्या मविप्र कॉलेजचे साहाय्यक प्राध्यापक शरद कांबळे आणि वनस्पतीशास्त्रज्ञ प्रा. डॉ. श्रीरंग यादव यांनी या जातीचा शोध लावला आहे. न्यूझीलंडच्या 'फायटोटॅक्सा' या संशोधनपत्रिकेने या शोधाची दखल घेतली आहे.

सह्याद्री पर्वतरांगेतील विविध वनस्पतींवर संशोधन करण्यासाठी 'गोखले एज्युकेशन सोसायटी'ने विशेष सहकार्य केले आहे. संस्थेला १०० वर्षे पूर्ण झाली, त्यावर्षी या संशोधनाला सुरुवात झाली. त्याची आठवण म्हणून नव्याने शोधलेल्या या वनस्पतीला 'गोखलेई' हे जाती नाम देण्यात आले आहे.

या शोधाच्या दोन महिन्यांपूर्वी याच अभयारण्यात 'पिंदा श्रीरंगी' ही वनस्पती पहिल्यांदा आढळली. त्यामुळे इथली वनसंपदा महत्त्वपूर्ण असल्याचे अधोरेखित झाले आहे.

**सूत्र** – 'हरिश्चंद्रगडावर बहरतेय 'विकोआ गोखलेई'चे पुष्प', maharashtratimes.com, ०२.१२.२०२०.

## गौताळा औट्रमघाट अभयारण्य

### गौताळा औट्रमघाट अभयारण्यात अतिक्रमणविरोधी कारवाई

गौताळा औट्रमघाट अभयारण्यात वन्यजीव विभागाने नोव्हेंबर महिन्यात अतिक्रमणविरोधी कारवाई केली. अभयारण्यातील ३० हेक्टर क्षेत्रावरील अतिक्रमणे हटवून वन्यजीव विभागाच्या पथकाने तिथे फळझाडांची लागवड केली.

मेहुनबार परिसरात अतिक्रमणे असल्याची माहिती वन विभागाला मिळाली. वन विभागाच्या पथकाने कागदपत्रे तपासून व मोजणी करून अतिक्रमण केलेली जागा ही वन्यजीव विभागाची असल्याची खात्री करून घेतली. इथे जवळपास १२ व्यक्तींनी अतिक्रमण केले होते. वन कर्मचारी व कामगारांसह जमिनीचे मोजमाप केल्यावर वन्यजीव विभागाने त्यांच्यावर कारवाई केली. आता या क्षेत्रावर फळवृक्ष व वैरण साधनसंपत्ती विकास योजनेंतर्गत कामे हाती घेण्यात आली आहेत.

**सूत्र** – 'गौताळ्यातील अतिक्रमणे हटविली', maharashtratimes.com, १०.११.२०२०.

## चांदोली अभयारण्य

### चांदोलीतील विस्थापितांच्या समस्यांच्या निराकरणासाठी शासनातर्फे शिबीर

चांदोली अभयारण्यामुळे विस्थापित झालेल्यांच्या समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे महसूल व वन विभाग आणि सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाची पुनर्वसन शाखा यांच्या वतीने डिसेंबर महिन्यात शिबीर घेण्यात आले.

चांदोली इथून विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी जमीन अतिक्रमण व अन्य अडचणींसदर्भात कागदपत्रांच्या पूर्ततेसह अर्ज करावेत, म्हणजे त्यांच्या समस्यांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येतील, असे पुनर्वसन विभाग व तहसीलदार कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले. जमीन वाटप, मूळ शेती मालकाकडून निर्माण होणारे अडथळे, भूखंड मागणी, नागरी सुविधा, हस्तांतरण महसूल संबंधी प्रश्न, सातबारा नोंदी, जमीन क्षेत्र नोंदी, शेती क्षेत्र मोजणी या विषयी शिबीरात चर्चा झाली. ग्रामपंचायतीची नवीन इमारत, पाण्याची स्वतंत्र टाकी, वसाहतीच्या आतील रस्ते व डांबरीकरण आदी मागण्या प्रकल्पग्रस्तांनी केल्या.

**सूत्र** – विजय लोहार. 'चांदोली प्रकल्पग्रस्तांसाठी अधिकारी आले दारात', www.esakal.com, १६.१२.२०२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### गोंदिया-चंद्रपूर-बल्लारशा रेल्वेमार्गावर १२ वर्षांत ५०पेक्षा जास्त वन्यप्राणी ठार



गोंदिया-चंद्रपूर-बल्लारशा रेल्वेमार्गावर गेल्या एका तपात सुमारे ५०पेक्षा अधिक वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या संवेदनशील पर्यावरण क्षेत्रात हा रेल्वेमार्ग येत असूनही खबरदारीच्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत रेल्वे खाते आणि पाठपुराव्याबाबत वन खाते गंभीर नाही.

वाघांचा वावर असणाऱ्या या पट्ट्यात १२ वर्षांत पाच वाघ, दोन बिबटे व इतर वन्यप्राण्यांचा बळी गेला आहे. बल्लारशा, जुनोना, सिंदेवाही, तळोधी, नागभीड, ब्रम्हपुरी या वनक्षेत्रातून जाणाऱ्या रेल्वेरुळांवर हे मृत्यू झाले.कोरोना विषाणूच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी लागू केलेल्या टाळेबंदीदरम्यान जून महिन्यात १३ रानडुकरांचा अपघाती मृत्यू या मार्गावर झाला. (संबधित वृत्त - *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड १ अंक ३).


१५ नोव्हेंबर २०१८ रोजी रेल्वेरूळ ओलांडताना वाघाच्या तीन बछड्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर या मार्गावर खबरदारीच्या उपाययोजनांसाठी सर्वेक्षण करण्यात आले. त्यात जुनोना, मामला, बाबूपेठ, लोहारा, मिंडाळा, ब्रम्हपुरी या

भागांमध्ये १९ ठिकाणी रेल्वेगाड्यांची गती कमी करण्याची गरज लक्षात आली. ब्रम्हपुरी व चंद्रपूर विभागातील मामला, जुनोना, सिंदेवाही, चिचपल्ली, तळोधी, बाळापूर, नागभीड परिक्षेत्रातील अतिसंवेदनशील वनक्षेत्रात नवीन भुयारी मार्ग सुचवण्यात आले. चंद्रपूर वनवृत्ताचे तत्कालीन मुख्य वनसंरक्षक एस.व्ही. रामाराव यांनी त्या सर्वेक्षणानंतर या उपाययोजनांबाबत दक्षिणपूर्व मध्य रेल्वेला पत्र लिहिले होते. मात्र, गेल्या दोन वर्षांत उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही झाली नाही.

ताडोबातून कन्हाळगाव व तिथून पुढे तेलंगणातील कावल व छत्तीसगडमधील इंद्रावती या वाघाच्या अधिवासांना जोडणारा वन्यजीव भ्रमणमार्ग आहे. ब्रम्हपुरी, चंद्रपूर, पश्चिम चांदा वनविकास महामंडळ, ब्रम्हपुरी वनविकास महामंडळ व प्रादेशिक विभाग, नवेगाव नागझिरा हे भाग या रेल्वेमार्गावर येतात. आता नागभीड ते नागपूर रेल्वेमार्गाचे रुंदीकरण, एकेरी मार्गाचा दुहेरी मार्ग, डिझेल ते विद्युतीकरण आणि प्रवासी ते मालगाडी वाहतूक असा बदल होणार आहे. त्यामुळे पुढील काळात आव्हाने आणखी वाढणार आहेत. म्हणून खबरदारीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी आवश्यक आहे, असे मत राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्याने व्यक्त केले आहे.

**सूत्र** – 'गोंदिया-चंद्रपूर-बल्लारशा रेल्वेमार्गावर ५० च्यावर वन्यप्राण्यांचा मृत्यू', www.loksatta.com, २९.१२.२०२०.

## ताडोबा अंधारीतील पाळीव हत्तींचे बोटेझरीत स्थलांतर



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पाच पाळीव हत्तींना गावापासून दूर गाभा क्षेत्रातील बोटेझरीत स्थलांतरित करण्यात आले आहे. प्रजनन संप्रेरकांच्या वाढीमुळे हत्ती आक्रमक झाल्यास जीवितहानीचा धोका टाळण्यासाठी हा निर्णय प्रकल्प व्यवस्थापनाने घेतला. ताडोब्यापासून बोटेझरीपर्यंतचा १८ किमीचा प्रवास हत्तीप्रेमी आनंद शिंदे यांच्या मदतीने सहा तासांत पूर्ण करण्यात आला.

ताडोबा प्रकल्पात गजराज हा पूर्ण वाढ झालेला नर, सुशीला व लक्ष्मी पूर्ण वाढ झालेल्या दोन मादी, त्यासोबत दोन वर्षांचा विश्वा व बाहुबली या सहा महिन्यांच्या हत्तीचा समावेश आहे. १६ नोव्हेंबर २०१९ रोजी माहुताचा मदतनीस असलेल्या वनकर्मचाऱ्याचा मोहर्ली इथे गजराजाने चिरडल्यामुळे मृत्यू झाला. त्याची आक्रमकता बघून गजराजाला काही दिवस साखळदंडाने बांधून ठेवण्यात आले. ऑक्टोबर २०२० मध्ये तो पुन्हा आक्रमक होण्याची चिन्हे दिसून आली. मागील अनुभव बघता त्याला गावानजीक ठेवणे घातक होते. म्हणून त्याला बोटेझरीत नेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**सूत्र** – पंकज मोहरीर. 'ताडोब्यातील हत्तींचे पुनर्वसन', maharashtratimes.com, २६.१२.२०२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात हवामान निरीक्षण मनोरा

केंद्रीय हवामान विज्ञान विभागाने पर्यटनाच्या दृष्टीने हवामानाचा अंदाज वर्तवण्याकरता प्रत्येक राज्यात हवामान निरीक्षण मनोरा उभारण्याची योजना आखली आहे. या योजनेअंतर्गत प्रायोगिक तत्त्वावरील एक मनोरा ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये उभारला जाणार आहे.

नागपूर हवामान विज्ञान केंद्राने मनोरा उभारणीसाठी पत्र पाठवून व्याघ्र प्रकल्प प्रशासनाची परवानगी मागितली आहे. मनोऱ्यासाठी जागेची पाहणी लवकरच केली जाणार आहे.

**सूत्र** – गोपालकृष्ण मांडवकर. 'ताडोबातील पर्यटकांच्या सेवेत दाखल होऊ पाहतोय वेदर ऑब्झर्वेशन टॉवर', www.lokmat.com, ०३.१२.२०२०.

## पर्यटकांना ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात बेकायदा सफारीला नेणारे अटकेत

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांना विनातिकीट सफारीला नेणाऱ्या दोन व्यक्तिंविरोधात चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये एक वनरक्षक आणि एक दलाल आहे. पर्यटनाला परवानगी नसताना या दोघांनी शुल्कापेक्षा जास्त रक्कम घेऊन पर्यटकांना बफर क्षेत्रासह ताडोबाच्या क्षेत्रात प्रवेश दिला. ही बाब वनाधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात आली.

**सूत्र** – 'ताडोबात विनातिकीट सफारी करणारे रॅकेट जेरबंद', www.lokmat.com, ०२.१२.२०२०.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पालगत वीजेचा धक्का लागल्यामुळे वाघाचा मृत्यू; तिघांना अटक

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला लागून असलेल्या पांगडी जंगल परिसरात वीजेचा धक्का लागल्यामुळे मृत झालेला वाघ आढळला. या प्रकरणी तिघांना अटक झाली असून त्यांनी या पूर्वीही वीजप्रवाहाचा वापर करून वन्यप्राण्यांच्या शिकारी केल्याचे चौकशीत उघड झाले आहे.

पांगडी परिसरात एका शेतात वाघ मृतावस्थेत आढळला. वाघाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह पाहून त्याचा मृत्यू आठदहा दिवसांपूर्वी झाला असावा, असा अंदाज पोलीस व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. वन विभागाने प्रशिक्षित कुत्र्याच्या मदतीने वाघाचे अवशेष आजूबाजूच्या शेतांतून हुडकून काढले.

वाघाचा नखासहित मागचा पाय, पुढील दोन्ही पायांची नखे, डोक्याचा भाग व शेपटी मिळाली नाही. तेव्हा तपास पथकाने अवशेष सापडले त्या शेतशिवारातील शेतकऱ्यांसह इतर संशयितांना चौकशीसाठी उपवनसंरक्षक कार्यालयात बोलावले. चौकशी दरम्यान, तिघांनी गुन्ह्याची कबुली दिली; वाघाला मारण्याकरता व त्याचे तुकडे करण्याकरता वापरलेले साहित्य वन विभागाच्या ताब्यात दिले. तसेच, वाघाला मारले ते व त्याचे अवयव फेकले ते ठिकाण दाखविले.

या तीन आरोपींपैकी दोन आरोपींनी यापूर्वी अशाच प्रकारे रानडुक्कर व चितळाची शिकार केल्याचे तर; तिसऱ्या आरोपीला पूर्वी चितळ शिकारप्रकरणी अटक झाली होती हे चौकशीदरम्यान उघड झाले.



**सूत्र** – मुनेश्वर कुकडे. 'गोंदियात विजेचा शॉक लावून वाघाची केली हत्या; वन विभागाने तिघांना केली अटक', www.esakal.com, २७.११.२०२०.

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### पेंच व्याघ्र प्रकल्पात काळा बिबट्या

पेंच व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांना काळा बिबट्या दिसल्याचे वृत्त आहे. नोव्हेंबर महिन्यात पेंचमध्ये एक काळा बिबट्या पर्यटकांना दिसला होता. मात्र, पर्यटकांना त्याची छबी टिपणे शक्य झाले नव्हते. डिसेंबर महिन्यात तुरीया गेटजवळ पर्यटकांनी काढलेल्या चित्रफितीत एक काळा बिबट्या स्पष्ट दिसत आहे. त्याच्यासोबत पिवळया-काळया ठिपक्यांचा सामान्य बिबट्यादेखील दिसत आहे. नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत दिसलेला काळा बिबट्या एकच आहे किंवा कसे या विषयी वृत्तात भाष्य केलेले नाही.

२०१९ मध्ये ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात आणि २०२० मध्ये सिंधुदुर्गातील आंबोली घाटात काळे बिबटे दिसले होते.

**सूत्र** – 'ताडोबापाठोपाठ पेंच व्याघ्रप्रकल्पातही काळ्या बिबट्याचे दर्शन', www.loksatta.com, ०३.१२.२०२०.

### पेंच व्याघ्र प्रकल्पात अवैध मासेमारी करणाऱ्यांचा व्याघ्र संरक्षण दलाच्या जवानांवर हल्ला

पेंच व्याघ्र प्रकल्पांतर्गत तोतलाडोह जलाशयात अवैध मासेमारी करणाऱ्या मासेमारांनी एक नोव्हेंबर रोजी वन विभागाच्या गस्ती पथकावर हल्ला केला व वन विभागाची बोट जाळली. या घटनेत वन खात्याचे सुमारे २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

तोतलाडोह जलाशय परिसरात गस्त घालणारे विशेष व्याघ्र संरक्षण दलाचे जवान एक नोव्हेंबरला रात्री दक्षिण बोदलझिरा नियत क्षेत्रातील तुमडीमट्टा संरक्षण कुटीत जेवायला आले होते. त्या वेळी ३० ते ४० बोटींनी आलेल्या ६०-७० मच्छिमारांनी संरक्षण कुटीला घेरले व शिवीगाळ करत जवानांवर दगडफेक सुरू केली. काहींनी पत्र्याच्या झोपडीत शिरून शासकीय साहित्याची व छतावर चढून सौर तावदानाची तोडफोड केली. कुटीत घुसलेल्या काही मासेमारांनी स्वयंपाकगृहातील सिलेंडर काढून स्फोट घडविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे जवानांनी गोळीबार सुरू केला. तेव्हा मच्छिमारांनी पाण्यात उभी असलेली पथकाची बोट नेली व जाळली. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचे अतिरिक्त मनुष्यबळ

आल्यानंतर त्यांनी कुटीजवळील परिसराची पाहणी करून कुटीत बंदिस्त झालेल्या जवानांची सुटका केली.

पेंच व्याघ्र प्रकल्प महाराष्ट्र व पेंच व्याघ्र प्रकल्प मध्यप्रदेश अशा दोन्ही राज्यांच्या अधिकाऱ्यांनी अवैध मासेमारी करणाऱ्यांविरोधात ऑक्टोबर महिन्यात कारवाई केली होती. मध्यप्रदेश वन खात्याने ६ ऑक्टोबर रोजी अवैध मासेमारी करुन मासे वाहतूक करणारी तीन वाहने जप्त केली व पाच जणांना अटक केली. महाराष्ट्र वन खात्यानेही बोटी व जाळे जप्तीची कारवाई केली. यामुळे चिडून मच्छिमारांनी हा हल्ला केला असावा, असा अंदाज आहे.

या प्रकरणी देवलापार पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरक्षेसाठी लावलेल्या कॅमेऱ्यात मच्छिमारांची छायाचित्रे आली असून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे संकेत वन विभाग व पोलीस खात्याने दिले आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राज्यांनी गस्त वाढविली आहे.

**सूत्र** – 'पेंच व्याघ्र प्रकल्प कर्मचाऱ्यांवर मासेमारांचा जीवघेणा हल्ला', www.loksatta.com, ०३.११.२०२०.



## <u>राधानगरी अभयारण्य</u>

### राधानगरी अभयारण्याच्या पर्यटन विकासाला मंजुरी; प्रकल्पग्रस्तांसह पर्यावरण अभ्यासकांचाही विरोध

राधानगरी अभयारण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ११० कोटी रुपये खर्चाच्या पर्यटन विकास आराखड्याला मंजुरी देत २५ कोटी रुपयांच्या तात्काळ तरतुदीची घोषणा केली आहे. त्याचवेळी निसर्गसंपदेची पायमल्ली करून पर्यटन आराखडा राबवू नये, असा इशारा पर्यावरणरक्षकांनी दिला आहे आणि 'पर्यटनासाठी पैसे आहेत; तर मग पुनर्वसनासाठी का नाही?', असा प्रश्न विचारत स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी पर्यटन आराखड्याला विरोध दर्शवला आहे.

आराखड्यानुसार प्रामुख्याने शाहूकालीन बेनझीर विला परिसर दुरुस्ती करून लेझर शो, हत्ती सफारी, हत्ती महाल परिसर दुरुस्ती करून साठमारी संग्रहालय, ध्वनी प्रक्षेपणाची सुविधा, राधानगरी धरण इथे नौकाविहार, राऊतवाडी-रामनवाडी धबधबा परिसर सुशोभीकरण, राधानगरी इथे पर्यटन विकास महामंडळाचे विश्रामगृह बांधणे, राधानगरी व काळम्मावाडी धरण इथे उद्यान, शिवगड किल्ला दुरुस्ती, अभयारण्यातील दुर्मीळ वनस्पती, पशू-पक्षी संशोधन केंद्र, दाजीपूर इथे तंबू निवास बांधणे, वन विश्रामगृह बांधणे आदी कामे प्रस्तावित आहेत. पर्यटनाला चालना देताना स्थानिकांना सामावून घेतले जाणार आहे.

दरम्यान, राधानगरी अभयारण्य भागातील प्रकल्पग्रस्तांच्या बैठकीत 'आधी पुनर्वसन; मग पर्यटन आराखडा,' अशी मागणी मांडण्यात आली आहे. पर्यावरण अभ्यासकांच्या मते प्रकल्पग्रस्तांची मागणी रास्त आहे. "पर्यटन, मनोरंजन या बाबी मुळात वन विभागाच्या कामकाजाचा भाग नाही. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून प्रस्ताव गेला असता तर चर्चा करता आली असती. केंद्रीय पातळीवरही या प्रकल्पाच्या मान्यतेला मिळण्याबाबत प्रश्नचिन्ह आहे. पर्यटन विकास आराखड्याचे पर्यावरण मूल्यांकन झालेले नाही. पर्यटन प्रकल्प राबवण्यासाठी शासनाकडे कोट्यवधीचा निधी असेल तर काळम्मावाडी (दूधगंगा) धरणग्रस्तांचे पुनर्वसन का रखडले आहे? राधानगरीतील प्रकल्पबाधितांच्या वाट्याला अशी उपेक्षा येऊ नये आणि वनसंपदेचे रक्षण व्हावे," अशी त्यांची भूमिका आहे.

त्याचबरोबर, राऊतवाडी- रामणवाडीसारख्या धबधब्यांच्या ठिकाणी स्थानिकांनी हुल्लडबाजीला आळा घालण्यासाठी पर्यटनावर नियंत्रण ठेवले आहे. अनियंत्रित पद्धतीने अभयारण्याच्या गाभा भागात पर्यटकांना सोडणे हे जंगल रक्षणाच्या मूळ हेतूला बाधा आणणारे आहे. संरक्षित भाग वगळता बाजूच्या क्षेत्रामध्ये प्राणी पाहणे शक्य आहे आदी बाबींकडे पर्यावरण अभ्यासकांनी लक्ष वेधले आहे.

**सूत्र** – दयानंद लिपारे. 'राधानगरी अभयारण्य पर्यटन विकासाला वादाची किनार', www.loksatta.com, ०१.१२.२०२०.

## सागरेश्वर अभयारण्य


### सागरेश्वर अभयारण्यात बिबट्याचे आगमन

सांगली जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण सागरेश्वर वन्यजीव अभयारण्यात बिबट्या दिसून आला आहे. त्यामुळे वन्यजीव विभागाने अभयारण्यात दुचाकीवरून प्रवेश करण्यावर बंदी घातली आहे. फक्त चारचाकी मोटारगाडीतून अभयारण्यात पर्यटनाची परवानगी दिली आहे. मात्र, दुचाकीवरून येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त होती. त्यामुळे बंदीचा परिणाम अभयारण्याच्या उत्पन्नावर झाला आहे.

वन्यजीव प्रशासन लवकरच सफारी गाड्यांचे नियोजन करणार असल्याचे अभयारण्याच्या साहाय्यक वन संरक्षकांनी सांगितले.

दरम्यान, राज्यात इतरत्र होत असलेल्या माणूस-बिबट्या संघर्षाच्या घटनांविषयी ऐकून व सागरेश्वरातील बिबट्याचे आगमन यांमुळे अभयारण्यालगतच्या परिसरात भीतीचे वातावरण आहे.

**सूत्र** – स्वप्नील पवार. 'बळी गेल्यावर जागे होणार का? बिबट्याची दहशत, वन विभाग निष्क्रीय', www.esakal.com, १५.१२.२०२०.
स्वप्नील पवार. 'बिबट्या आला आणि सागरेश्वर अभयारण्याचे उत्पन्न घटले', www.esakal.com, १८.१२.२०२०.




## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात हिमालयातील गिधाड

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात या वर्षाच्या सुरुवातीला हिमालयातील गिधाड दिसून आले. 'हिमालयीन ग्रिफन' म्हणून ओळखली जाणारी हिमालयातील गिधाडे उत्तरेकडील राज्यांत आढळतात. साधारण हिवाळ्यात ही गिधाडे राजस्थान, गुजरातमध्ये आलेली दिसतात.

पक्ष्यांच्या नोंदी ठेवणाऱ्या ई-बर्ड या संकेतस्थळावरील नोंदीनुसार (https://ebird.org/india/species/himgri1) यापूर्वी महाराष्ट्रात बीडजवळ या प्रकारचे गिधाड दिसले होते. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील नोंदी ई-बर्डवर उपलब्ध नाहीत, मात्र पक्षी निरीक्षकांनी इथे क्वचित याच्या नोंदी केल्याचे वृत्तात म्हटले आहे.



**सूत्र** – 'राष्ट्रीय उद्यानात हिमालयीन गिधाड', www.loksatta.com, ०२.०१.२०२१.

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बिबट्याची गरोदर मादी वाहनाच्या धडकेत ठार

नोव्हेंबर २०२० मध्ये घोडबंदर रस्ता ओलांडताना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बिबट्याची गरोदर मादी वाहनाच्या धडकेत ठार झाली. त्यानंतर उद्यानाच्या अधिकाऱ्यांनी वन्यप्राण्यांसाठी बोगदे व पूल उभारण्याचा, तसेच सध्या आहेत त्या पुलांमध्ये सुधारणा करण्याचा व मोऱ्या रुंदीकरणाचा सल्ला दिला आहे, जेणेकरून वन्यप्राण्यांना घोडबंदर रस्ता सुरक्षितपणे ओलांडता यावा.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यालगत सध्या पायाभूत सुविधाजनक चार प्रकल्पांचे बांधकाम सुरू आहे. गेली दोन वर्षे इथे महामार्गाच्या रुंदीकरणाचेही काम सुरू आहे. मात्र, सध्याच्या रस्त्यावर गतिरोधक उभारणे शक्य नसल्याने वाहनचालकांमध्ये गतिमर्यादा पाळण्याबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे, असे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्र संचालक व वन संरक्षकांनी सांगितले.

**सूत्र** – संजना भालेराव. 'SGNP suggests mitigation measures month after pregnant leopard's death in road accident', www.indianexpress.com, १७.१२.२०२०.

### ‘आरे वाचवा’ चळवळीतील आंदोलकांवरील गुन्हे अजूनही कायम

‘आरे वाचवा’ चळवळीतील २९ आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया रखडली आहे. २ डिसेंबर २०१९ रोजी या संदर्भात समिती स्थापन करण्याचा शासननिर्णय काढण्यात आला होता. अलीकडे सप्टेंबर २०२० मध्ये दहा दिवसांच्या आत गुन्हे मागे घेतले जातील, असे आश्वासन राज्य शासनाने या आंदोलकांना दिले होते. मात्र, अजूनही विद्यार्थी व महिलांसह सामान्य नागरिकांवरील गुन्हे कायम असल्याने त्यांना दैनंदिन जीवनात अडचणी येत आहेत.

सप्टेंबरमध्ये आंदोलकांच्या प्रातिनिधीक शिष्टमंडळाने गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांची भेट घेतली होती. तेव्हा दहा दिवसांच्या आत प्रक्रिया पूर्ण करून आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले जातील, असे आश्वासन शिष्टमंडळाला त्यांनी दिले होते.

मात्र, नोव्हेंबरअखेरीसही ही प्रक्रिया अजून सुरूच असल्याचे कळल्यामुळे आंदोलकांच्या प्रतिनिधींनी राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांची भेट घेतली. ५ ऑक्टोबर २०१९ रोजी नोंदविलेले गुन्हे मागे घेण्यासंदर्भात आदोलकांनी २७ फेब्रुवारी रोजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील, २९ फेब्रुवारी रोजी परिमंडळ १२ चे पोलिस उपायुक्त डॉ. डी. एस. स्वामी, २ मार्च रोजी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांची भेट घेतल्याचे गृहमंत्र्यांना सांगितले. मात्र नोव्हेंबर २०२० अखेरीसही परिस्थिती जैसे थे असल्याचे आंदोलकांनी देशमुख यांना सांगितले. तेव्हा, संबंधित प्रक्रिया लवकरच पूर्ण करून गुन्हे मागे घेतले जातील, असे आश्वासन गृहमंत्र्यांनी दिले.

**सूत्र** – ‘आरे आंदोलकांच्या पदरी निराशाच; गुन्हे अजूनही कायम’, maharashtratimes.com, २६.११.२०२०.

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या व्याघ्र विहारात वाघिणीचे आगमन

चंद्रपूर इथल्या वन्यजीव निवारा केंद्रातील वाघिणीला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील व्याघ्र विहारात ठेवले जात आहे. व्याघ्र विहारामध्ये सध्या बिजली (वय ९), मस्तानी (९) आणि लक्ष्मी (१०) या तीन प्रौढ वाघिणी आहेत. व्याघ्र विहारात गेल्या वर्षी नागपूरहून सुलतान हा पाच वर्षांचा नर वाघ जोडीदार म्हणून व्यवस्थापनाने आणला होता. मात्र वाघिणींचे वय अधिक असल्यामुळे प्रजनन अयशस्वी ठरले, राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्र संचालकांनी ही माहिती दिली.

नव्या वाघिणीची मागणी उद्यानातर्फे करण्यात आली होती. त्यानुसार या वाघिणीला आणण्याचा निर्णय झाला. ही मादी चंद्रपूर वन परिक्षेत्रात आठ महिन्यांपूर्वी एका गावातील गोठ्यानजीक बेवारस स्थितीत सापडली होती. त्या वेळी या बछड्याच्या आईशी पुनर्भेट घडवून आणण्याच्या वन विभागाच्या प्रयत्नांना यश आले नाही. तेव्हापासून ही वाघीण वन्यजीव निवारा केंद्रात आहे. सध्या तिचे वय ११ महिने असून प्रजननक्षम होण्यासाठी ती किमान अडीच वर्षे वयाची होणे गरजेचे आहे. या वाघिणीला व्याघ्र विहारातील पिंजऱ्यात ठेवले जाणार आहे. मात्र तिला बघण्याची संधी पर्यटकांना इतक्यात मिळणार नाही.

**सूत्र** – ‘राष्ट्रीय उद्यानात आज आणखी एका वाघिणीचे आगमन’, www.loksatta.com, २२.११.२०२०.

## ज्ञानगंगा अभयारण्य

### ज्ञानगंगा अभयारण्यात पहिल्यांदा गवा दिसला

ज्ञानगंगा अभयारण्यातील देव्हारी भागात वन्यजीव वनपरिक्षेत्राधिकाऱ्यांना सहा डिसेंबर रोजी गस्त घालताना गवा दिसून आला. या अभयारण्यात गवा दिसण्याची ही पहिलीच वेळ आहे. बुलडाणा जिल्ह्यालगत असलेल्या मेळघाटाच्या परिसरात गवे आढळतात. हा गवा तिथून ज्ञानगंगा अभयारण्यात आला असावा अशी शक्यता आहे. तो कुठून व नेमका कोणत्या मार्गाने आला, याचा वन्यजीव विभाग शोध घेणार आहे.



**सूत्र** – ‘ज्ञानगंगा अभयारण्यात प्रथमच रानगव्याचे दर्शन’, www.lokmat.com, ०७.१२.२०२०.

### ज्ञानगंगा अभयारण्याला इतर व्याघ्र अधिवासांशी जोडण्यासाठी वन्यजीव भ्रमणमार्गांची गरज

यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातील वाघाने तीन हजार किमी अंतर फिरून मग अधिवासासाठी बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्याची निवड केली. भरपूर चालल्यामुळे 'वॉकर' म्हणून ओळखल्या जाऊ लागलेल्या या वाघाच्या निमित्ताने वन्यजीव भ्रमणमार्गाची गरज अधोरेखित झाली आहे.

ज्ञानगंगा अभयारण्यात स्थिरावल्यानंतर 'वॉकर'ने २०५ चौरस किमी क्षेत्र अधिवासासाठी निवडले आहे. या ठिकाणी त्याला जोडीदार म्हणून वाघीण सोडण्याचा वनाधिकाऱ्यांचा विचार आहे. 'वॉकर'वर लक्ष ठेवण्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीनेही वाघीण सोडण्याची शिफारस केली आहे.

मात्र, या परिसरात वाघांची संख्या वाढविण्यापूर्वी इतर जंगलांना जोडणारा वन्यजीव भ्रमणमार्ग तयार करावा लागणार आहे. वाघाचा संचार असलेला अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व जळगाव जिल्ह्यातील मुक्ताई भवानीचा परिसर ज्ञानगंगा अभयारण्याला जोडला जाऊ शकतो; अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा अभयारण्य आणि वाशीम जिल्ह्यातील कारंजा सोहोळच्या बाबतीत मात्र अडचणी येऊ शकतात, असे वृत्तात म्हटले आहे.

**सूत्र** – ''वॉकर'च्या निमित्ताने कॉरिडॉरचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर', www.loksatta.com, १७.११.२०२०.

### ज्ञानगंगा अभयारण्यात मृत बिबट्या; हद्दीबाबत वनाधिकाऱ्यांत संभ्रम

ज्ञानगंगा अभयारण्याच्या हद्दीत कवळगाव इथे नियत क्षेत्र क्रमांक २६८ मध्ये मृत बिबट्या आढळला. बिबट्याचा मृतदेह कुजू लागल्यामुळे दोन दिवसांपासून परिसरात दुर्गंधी येत होती. त्यामुळे आजूबाजूच्या शेतकरी व मजुरांनी जाऊन पाहिले असता त्यांना मेलेला बिबट्या दिसून आला. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मात्र, पंचनामा व शवविच्छेदनाची कार्यवाही करण्यापूर्वी बिबट्याचा मृतदेह सापडला तो भाग नेमका वन्यजीव विभागाच्या अखत्यारित येतो की प्रादेशिक वन विभागाच्या, याविषयी वनाधिकाऱ्यांना संभ्रम होता. तसेच, नियत क्षेत्राचे वनरक्षक तिथे फिरकले नसल्याची तक्रारही नागरिकांनी वरिष्ठ वनाधिकाऱ्यांकडे केली आहे.

**सूत्र** – 'कवळगाव बिटमध्ये बिबट्या मृतावस्थेत आढळला', www.lokmat.com, १०.११.२०२०.

## राज्यस्तरीय बातम्या

### व्याघ्र प्रकल्पाबाहेरील वाघांच्या मृत्यूचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक



व्याघ्र प्रकल्पाबाहेरील वाघांच्या मृत्यूचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. वाघांची संख्या वाढत असताना अधिवास खंडित होण्यामुळे संरक्षित क्षेत्राबाहेरील वाघांचे मृत्यू गेल्या दोन वर्षांत वाढल्याचे दिसून आले आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाची आकडेवारी 'टायगरनेट' या संकेतस्थळावर नोंदवली जाते. या आकडेवारीनुसार देशभरात २०२० मध्ये १०५ वाघांच्या मृत्यूची नोंद झाली. देशभरात ६४ मृत्यू व्याघ्र प्रकल्पाच्या आत व ४१ मृत्यू बाहेर झाले. महाराष्ट्रात हे प्रमाण समसमान असल्याचे दिसते. गेल्या वर्षी राज्यात १६ वाघांच्या मृत्यूची नोंद झाली असून, त्यापैकी ८ मृत्यू हे संरक्षित क्षेत्राबाहेर झाले आहेत.

आकडेवारीमध्ये वाघांच्या मृत्यूचे कारण नोंदविणे बंधनकारक आहे, मात्र वाघांच्या मृत्यूमध्ये शिकारीचे प्रमाण अधिक असल्याचे कारण न नोंदविण्याकडेच यंत्रणांचा कल असल्याचे वन्यजीव अभ्यासकांचे मत आहे. हे २०२० या वर्षाच्या आकडेवारीतही दिसून येते.

वर्ष २०१८च्या व्याघ्रगणनेनुसार राज्यात वाघांची संख्या ३१२ इतकी आहे. वनाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रपूरमध्ये वाघांचे प्रमाण सर्वाधिक असून तिथे निम्मे वाघ व्याघ्र प्रकल्पाबाहेर आहेत; या ठिकाणी अधिवासाचा प्रश्न किचकट आहे.

प्रकल्पाबाहेरील जंगल हे खंडित आणि विखुरलेल्या स्वरूपात आहे. तसेच काही ठिकाणी जंगलाचा ऱ्हासदेखील

झाला आहे. दोन वन्य क्षेत्रांमधील जागेमध्ये जंगल वाढविण्यावर भर द्यावा लागेल. तसेच, विकास प्रकल्पांना वनजमीन देताना पर्यायी जमीन म्हणून दोन वन्यक्षेत्रांमधील क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्याच्या दृष्टीने विचार व्हायला हवा, असे राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नितीन काकोडकर यांनी सांगितले.


**सूत्र** – 'व्याघ्र प्रकल्पाबाहेरील वाघांच्या मृत्यूचे प्रमाण राज्यात सर्वाधिक', www.loksatta.com, ०४.०१.२०२१.

### हरिहरेश्वरच्या किनारी 'ऑलिव रिडले' कासवाचे हंगामातील पहिले घरटे

रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वरच्या समुद्र किनारी 'ऑलिव रिडले' कासवाचे यंदाच्या हंगामातील पहिले घरटे  डिसेंबर महिन्यात आढळून आले. या घरट्यात सुमारे १३८ अंडी असून ती सुरक्षित ठिकाणी उबवणी केंद्रात हलविली आहेत. दरवर्षी या भागात ऑलिव्ह रिडलेची सुमारे पाच ते दहा घरटी सापडत असल्याची माहिती स्थानिक रहिवाशांनी दिली आहे.

सर्वसाधारणपणे डिसेंबर ते फेब्रुवारीच्या दरम्यान कोकण किनारपट्टीवर 'ऑलिव्ह रिडले' कासवे विणीसाठी येतात. १५ वर्षांपूर्वी किनाऱ्यावरील कासवांची घरटी, अंडी कुत्री किंवा अन्य जनावरांच्या भक्ष्यस्थानी पडायची. त्यामुळे अंड्यांना संरक्षण देऊन कासवांच्या संवर्धनाचे काम २००३ साली सह्याद्री निसर्ग मित्र या संस्थेने ग्रामस्थांच्या सहकार्याने सुरू केले. सध्या रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत २७ ठिकाणी अशी संवर्धन केंद्रे ग्रामस्थ आणि वन विभागाच्या माध्यमातून कार्यरत आहेत.

**सूत्र** – 'कोकणकिनारी 'ऑलिव्ह रिडले'च्या विणीच्या हंगामास सुरुवात', www.loksatta.com, २८.१२.२०२०.



### पुणे शहरात एका महिन्यात तीन गवे; एकाचा मृत्यू

पुणे शहर परिसरात एका महिन्यात तीन वेळा गवा दिसून आला. कोथरुड इथे नऊ डिसेंबर २०२० रोजी, त्यानंतर दोनच आठवड्यांनी बावधन परिसरात आणि त्यानंतर जानेवारी २०२१ च्या सुरुवातीला हिंजेवाडी भागात गवा दिसला.

कोथरूड परिसरात आलेल्या गव्याला पकडण्यासाठी वन विभागाकडून बचाव मोहीम राबविण्यात आली होती. जवळपास पाच तासांच्या प्रयत्नांनंतर वनाधिकाऱ्यांनी गव्यावर नियंत्रण मिळविले पण अखेरीस गव्याचा मृत्यू झाला. लोकांच्या प्रचंड गर्दीमुळे गवा बिथरला व भुलीचे इंजेक्शन मारल्यानंतर त्याची धावाधाव झाल्यामुळे घाबरून मृत्यू झाला असण्याची शक्यता वनाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या घटनेपाठोपाठ बावधन परिसरात पुणे-बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर एक गवा दिसून आला. गव्याच्या मागे लागलेला जमाव, गव्याचे पुण्यातील रस्त्यांवरून वेडेवाकडे धावणे आणि सरतेशेवटी पकडल्यावर गव्याचा मृत्यू हा घटनाक्रम आठवणीत ताजा असल्याने या खेपेला गव्याला बेशुद्ध न करता नैसर्गिक अधिवासात पाठविण्याचे वनाधिकाऱ्यांनी ठरविले. वनाधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी, पोलिस व अन्य कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांती गव्याला पकडले व वन विभागाने त्याला पुन्हा जंगलात सोडले.

या भागात पूर्वीपासून गव्यांचा वावर असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. गवे माणसांना कोणताही त्रास न देता नियमित टेकड्यांलगतच्या परिसरात फिरतात आणि जंगलात निघून जातात, असा स्थानिकांचा अनुभव आहे.

तिसऱ्या घटनेत हिंजेवाडीजवळ माणगाव भागातील रक्षे वस्तीत भल्या पहाटे गवा दिसला. मात्र, तो आपणहूनच ऊस शेतीच्या दिशेला निघून गेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

विस्तारलेल्या पुणे शहराच्या सीमा सह्याद्रीच्या डोंगररांगांजवळ जाऊन पोहोचल्या आहेत. या भागात वन्यजीवांचा अधिवास व सह्याद्रीतील जंगलांना जोडणारा त्यांचा भ्रमणमार्गही आहे. शहरी भाग वनांच्या जवळ गेल्याने भविष्यातही वन्यप्राणी शहरी भागात आल्याचे दिसणार आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांबरोबरचे सहअस्तित्व आपण स्वीकारले पाहिजे, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

**सूत्र** – 'पुण्यात पकडलेल्या रानगव्याचा दुर्दैवी मृत्यू', www.loksatta.com, ०९.१२.२०२०.
'पुण्यात पुन्हा एकदा गव्याचं दर्शन; वनविभाग घटनास्थळी दाखल', www.loksatta.com, २२.१२.२०२०.
'रानगव्याला बेशुद्ध न करता पुन्हा जंगलाच्या नैसर्गिक अधिवासात पाठवणार – वनाधिकारी', www.loksatta.com, २२.१२.२०२०.
'प्राण्यांचे सहअस्तित्व स्वीकारण्याची गरज; वन विभागाचे पुणेकरांना आवाहन', maharashtratimes.com, २४.१२.२०२०.
'Hinjewadi: Now Indian gaur sighted in Maangaon', punekarnews.in, ०१.०१.२०२१.

## पँगोलीनच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र अभ्यासगट नेमणार

खवलेमांजर अर्थात पँगोलीनची शिकार व तस्करीत वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यासाठी अभ्यासगट नेमून कृती आराखडा करण्यास वन विभागास मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांत खवलेमांजरांच्या शिकार व तस्करीच्या २० घटना घडल्या आहेत. खवलेमांजराचे अस्तित्त्व महाराष्ट्रात सर्वत्र आहे. मात्र, कोकण व विदर्भात त्यांच्या शिकारी आणि तस्करीच्या नोंदी अधिक आहेत.

राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य आणि सह्याद्री निसर्ग मित्र या संस्थेचे भाऊ काटदरे यांनी अभ्यासगटाचा प्रस्ताव वन्यजीव मंडळाच्या ऑगस्टमध्ये झालेल्या बैठकीत मांडला. त्यानंतर वन विभागाने शासनाकडे तसा प्रस्ताव पाठविला होता. त्या प्रस्तावाला नुकतीच मंजुरी मिळाल्याचे राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी सांगितले.

अभ्यासगटाच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत खवलेमांजराच्या संरक्षण-संवर्धनासाठी कृती आराखडा तयार केला जाईल. खवलेमांजरांच्या शिकारीमध्ये संघटित क्षेत्राचा सहभाग आहे किंवा कसे याचा अभ्यास केला जाईल. कृती आराखड्यात सर्वेक्षण, जनजागृती तसेच जनुकीय नमुने जमा करण्याचा प्रस्ताव आहे. जनुकीय नमुने जमा केल्यामुळे शिकारीच्या घटनांमध्ये सापडलेल्या अवयवांशी तुलना करणे शक्य होईल. तसेच, खवलेमांजराच्या उपजाती असल्याची शक्यता पडताळून पाहण्यासाठी अभ्यास होऊ शकेल.

**सूत्र** – 'खवल्या मांजरांची शिकार, तस्करी रोखण्यासाठी अभ्यासगट', www.loksatta.com, १६.१२.२०२०.


## संवेदनशील वन्यजीव अधिवास प्रस्तावांच्या परीक्षणासाठी चार उपसमित्या

राज्यातील सर्व संरक्षित क्षेत्रांकरिता संवेदनशील वन्यजीव अधिवासा (critical wildlife habitat) च्या प्रस्तावाचे परीक्षण करण्यासाठी महसूल विभागनिहाय चार उपसमित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. संवेदनशील वन्यजीव अधिवासाचे प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी हे प्रस्ताव उपसमिती तयार करून तिच्याकडे परीक्षणासाठी पाठवण्यात यावे, असा निर्णय राज्य वन्यजीव मंडळाच्या १५व्या बैठकीत घेण्यात आला होता. त्यानुसार या उपसमित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

वनहक्क कायदा २००६ नुसार वन्यजीवांसाठी संरक्षित 'संवेदनशील वन्यजीव अधिवास' अधिसूचित करणे अपेक्षित आहे. त्यासाठी केंद्र सरकारने चार जानेवारी २०१८ रोजी पत्रान्वये मार्गदर्शक सूचना लागू केल्या आहेत.

एका उपसमितीला प्रस्ताव पडताळणीचे काम दिल्यास विलंब होऊ शकतो, हे लक्षात घेऊन महसूल विभागानुसार चार – नागपूर, अमरावती, कोकण व नाशिकसाठी एक आणि पुणे व औरंगाबादसाठी एक – उपसमित्या गठित करण्यात आल्या आहेत. या चारही उपसमित्यांना प्राप्त होणारे प्रस्ताव केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आहेत किंवा नाही, त्यांची निर्मिती करताना स्थानिक लोकांचे हित जोपासले जात आहे का, जैवविविधतेचे संवर्धन होईल की नाही, याबाबत तपासणी करायची आहे.

**सूत्र** – 'संरक्षित क्षेत्राकरिता धोकाग्रस्त वन्यजीव अधिवासाचे परीक्षण', www.loksatta.com, १६.१२.२०२०.



## कोल्हापूर, सातारा व सिंधुदुर्गात संवर्धन राखीव क्षेत्रांना मंजुरी; राज्य वन्यजीव मंडळाचे इतरही निर्णय

कोल्हापूर, सातारा व सिंधुदुर्गातील वन क्षेत्रांना संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा देण्याच्या प्रस्तावाला महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली आहे. कोयना, चांदोली, राधानगरी, तिलारी ते आंबोलीपर्यंत एकूण ८६,५५४ हेक्टर वन क्षेत्राला हा दर्जा देण्यात आला आहे. हे क्षेत्र वन्यजीवांच्या भ्रमणपट्टयाचा भाग आहे. याचबरोबर चंद्रपूर जिल्ह्यातील कन्हाळगाव हे राज्यातील ५० वे अभयारण्य घोषित करण्यात आले असून त्याचे क्षेत्रफळ २६९ चौरस किलोमीटर आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

कोल्हापूर जिल्ह्यातील पाच – चंदगड संवर्धन राखीव क्षेत्र, आजरा-भूदरगड, गगनबावडा, पन्हाळगड व विशाळगड, सिंधुदुर्गातील एक – आंबोली दोडामार्ग संवर्धन राखीव क्षेत्र, साताऱ्यातील दोन - जोर जांभळी आणि मायनी, विदर्भातील दोन – महेंद्री व मुनिया ही नवीन संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत.


वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ मध्ये 'संवर्धन राखीव क्षेत्र' असा दर्जा देण्याची तरतूद आहे. या कायद्याने संवर्धन राखीव क्षेत्राची व्याख्याही केली आहे.

या बैठकीत आधीच्या संवर्धन क्षेत्रांत महत्त्वाची कामे करण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी द्यावा या वन विभागाच्या मागणीवर प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. अवनी वाघिणीच्या पिल्लाची संपूर्ण वाढ झाली असून या पिल्लाला पेंच इथे नैसर्गिक अधिवासात सोडण्यास मान्यता देण्यात आली.

नवीन मार्गस्थ बचाव केंद्रे सुरू करण्यासाठी नाशिक, पुणे इथून प्रस्ताव प्राप्त, जुन्या मार्गस्थ बचाव केंद्रास निधी देऊन सक्षम करण्याचा निर्णय बैठकीत झाला. बिबट्या व माणूस संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. महेंद्रीला संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करताना भविष्यात त्याचे अभयारण्यात रूपांतर करण्यापूर्वी लोकांना विश्वासात घेऊन, गावकऱ्यांशी चर्चा करून पुनर्वसनाचा कालबद्ध कार्यक्रम तयार करण्याची सूचना त्यांनी केली. राज्याचे वनमंत्री संजय राठोड व पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे या बैठकीस उपस्थित होते.

**सूत्र** – संदीप आडनाईक. 'कोल्हापूर, सातारा, सिंधुदुर्गातील सात वनक्षेत्र आता संवर्धन राखीव वनक्षेत्र', www.lokmat.com, ०४.१२.२०२०. 'पश्चिम घाटात आठ नवी संरक्षित वने', www.loksatta.com, ०५.१२.२०२०.

## चंद्रपूर-मूल वन्यजीव भ्रमणमार्गासाठी खबरदारीच्या उपाययोजनांचे भिजत घोंगडे



महाराष्ट्रातील चंद्रपूर-मूल हा भ्रमणमार्ग वन्यप्राण्यांसाठी धोकादायक ठरत आहे. या भ्रमणमार्गावर गेल्या दशकात वाघ, बिबट्यांसह सुमारे शंभर वन्यप्राण्यांचा बळी गेला आहे. राष्ट्रीय हरित लवादा (NGT) ने राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने दिलेल्या कृती आराखड्याचे पालन केल्याशिवाय रस्ते प्रकल्प पुढे जाऊ शकत नाही, असा निकाल दिला आहे. हा निकाल आल्याला चार महिने झाले तरी रस्ते विकास व महामार्ग मंत्रालयाकडून या रस्त्यावर वन्यजीवांसाठी खबरदारीच्या उपाययोजनांबाबत हालचाल दिसत नाही.

ताडोबा अंधारी, बोर, नवेगाव नागझिरा या व्याघ्र प्रकल्पांसह शेजारच्या राज्यांमधील व्याघ्र अधिवासांना जोडणाऱ्या या वन्यजीव भ्रमणमार्गाला नऊ रस्ते प्रकल्पांमुळे अडथळा निर्माण होत आहे. या भ्रमणमार्गावर वाघांची घनता अधिक आहे. त्याची दखल घेत राष्ट्रीय हरित लवादाने राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे केलेल्या शिफारसीनुसार, या भ्रमणमार्गावर रस्त्यांचे काम करण्याचे निर्देश रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाला जानेवारी २०२० च्या सुरुवातीला दिले. त्यावर हरकती असल्यास १५ दिवसांच्या आत त्या मांडण्यास सांगितले. त्यानंतर १७ जानेवारीला रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने लवादासमोर प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यात चार रस्त्यांवरील रस्ते निर्माणाचे काम प्राधिकरणाच्या निर्देशानुसार करण्याला सहमती दर्शवत त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केल्याचे सांगितले व तीन वर्षांत काम पूर्ण करण्याची हमी दिली. मात्र, चंद्रपूर-मूल, बामणी-नवेगाव रस्त्यांसाठी अतिरिक्त खर्चाची तरतूद करण्याबाबत असमर्थता दर्शवली व राज्याच्या वन खात्याने त्यासाठी निधी द्यावा, अशी मागणी केली. त्यानंतर सात जुलैला लवादाने सर्व युक्तिवाद व मागील आदेश विचारात

घेऊन प्राधिकरणाने तयार केलेल्या कृती आराखड्याचे पालन केल्याशिवाय रस्ते विकास व महामार्ग मंत्रालयाचा प्रकल्प पुढे जाऊ शकत नाही, असा निकाल दिला. त्यामुळे मंत्रालय लवादाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणार की कसे, यावर वन्यजीवांची सुरक्षा अवलंबून आहे.

दरम्यान, राज्य वन्यजीव मंडळाच्या १५व्या बैठकीत ठरल्यानुसार राज्याच्या वन खात्याने वन्यजीवांचा अधिवास असणाऱ्या क्षेत्रातून जाणारे रस्ते दुरुस्त करण्यासाठी किंवा नवीन रस्ते करण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना आखण्याबाबत सूचना करणारे परिपत्रक काढले आहे. (संबंधित वृत्त - *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र* खंड १ अंक ३).

**सूत्र** – 'वन्यजीव भ्रमणमार्ग धोकादायक', www.loksatta.com, ०९.१२.२०२०.
राखी चव्हाण. 'वन्य जीवांबाबत सरकारी यंत्रणा उदासीन', www.loksatta.com, ११.१२.२०२०.

**राज्यासाठी स्वतंत्र वन्यजीव धोरणाची राज्य वन्यजीव मंडळ सदस्याची मागणी**


महाराष्ट्रातील वन्यजीवांसमोर सध्या असलेली व भविष्यात निर्माण होतील ती आव्हाने पेलता यावीत यासाठी राज्याचे स्वतंत्र वन्यजीव धोरण असावे, अशी मागणी राज्य वन्यजीव मंडळ सल्लागार समितीच्या एका सदस्याने केली आहे. समितीचे सदस्य बंडू धोतरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवून ही मागणी केली आहे.

वन्यजीव धोरण ठरविण्यासाठी धोतरे यांनी आराखडे, नियोजन व उपाययोजनाही सुचविल्या आहेत. एकीकडे विकास होत असताना दुसरीकडे लोकसंख्या वाढ, वन्यप्राण्यांच्या अधिवासावर अतिक्रमण आदींमुळे वन्यजीव संरक्षण, संवर्धनासमोरील आव्हाने वाढत आहेत. मात्र, आव्हानांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन व्यापक नियोजन होत नाही, असे मत त्यांनी पत्रात मांडले आहे.

वृत्तात नमूद केले आहे की राज्याचे वन धोरण २००८ मध्ये तयार झाले. मात्र, त्यात वन्यजीव व जैवविविधता संवर्धनाचा मुद्दा केवळ दोन उताऱ्यात मांडला आहे. या महत्त्वाच्या मुद्द्यासाठी व्यापक धोरण नाही.

**सूत्र** – 'राज्याचे स्वतंत्र 'वन्यजीव धोरण' हवे', www.lokmat.com, ०४.१२.२०२०.

**नागपूर व चंद्रपूर जिल्हयांत दीर्घ काळानंतर माळढोक पक्ष्याचे दर्शन**



नागपूर जिल्ह्यातील ठेमसाना व चंद्रपूर जिल्ह्यात वरोरा इथे नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) पक्षी दिसून आले आहेत. तीन वर्षांपूर्वी वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने केलेल्या सर्वेक्षणांती महाराष्ट्रात एकही माळढोक आढळला नव्हता. त्यामुळे तो राज्यातून नामशेष झाला असावा, असे मानले जात होते.

नागपुरातील ठेमसाना परिसरात २०१० मध्ये माळढोक दिसला होता. त्याच परिसरात या खेपेला शेतकऱ्यांना हा पक्षी दिसला व त्यांनी वन विभागाच्या साहाय्याने तो माळढोक असल्याची खात्री करून घेतली.

**सूत्र** – राजेश रामपूरकर. 'नागपूर जिल्ह्यात तब्बल दहा वर्षांनंतर दिसला माळढोक', www.esakal.com, ०३.११.२०२०.

## माणूस-बिबट्यासंबंधी वृत्त

**महाराष्ट्रात ११ महिन्यांत १७३ बिबट्यांचा मृत्यू**

महाराष्ट्रात जानेवारी ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत १७३ बिबट्यांचा मृत्यू झाला. २०१९ मध्ये झालेल्या ११० मृत्यूंच्या तुलनेत ही संख्या ५७ टक्क्यांनी अधिक आहे. सर्वाधिक – ७० मृत्यू नाशिकमध्ये झाले. त्या पाठोपाठ पुणे व कोल्हापुरात प्रत्येकी २६ मृत्यू झाले. वन विभागाच्या आकडेवारीनुसार, १७३ पैकी ८५ बिबट्यांचा मृत्यू नैसर्गिक, ६४ अपघाती व १७ बिबट्यांची शिकार झाली. या १७ पैकी सात बिबट्यांना वीजप्रवाहाचा वापर करून ठार करण्यात आले.

२०२० या वर्षात रस्ते व रेल्वे अपघातात ठार झालेल्या बिबट्यांची संख्या २०१९ च्या तुलनेत दुप्पट झाली आहे. २०१९ मध्ये ती १७ होती व २०२० मध्ये ती ३४ झाली. बुडून मृत्युमुखी पडलेल्या बिबट्यांची संख्या २०१९ व २०२० या वर्षांत अनुक्रमे १० व २५ आहे.

माणूस-बिबट्या संघर्षात ठार झालेल्या माणसांच्या संख्येतही वाढ झाली आहे. २०१९ मध्ये ही संख्या आठ होती; नोव्हेंबर २०२० पर्यंत २३ झाली. राज्य वन्यजीव मंडळाने नोव्हेंबर २०२० मध्ये माणूस-बिबट्या संघर्ष तीव्र असलेल्या भागातील हानीचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, विहिरीत वन्यप्राणी पडू नयेत यासाठी पुणे, नाशिक, औरंगाबाद, धुळे व अमरावती जिल्ह्यांत विहिरींभोवती भिंती व वर जाळी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी शीघ्र प्रतिसाद दलेही तयार ठेवण्यात आली आहेत. वन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत आणि रस्ते व वाहतूक मंत्रालय व वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याबाबत पत्र पाठविले आहे.

**सूत्र** – संजना भालेराव. '57% increase in leopard deaths from last year, highest in Nashik', www.indianexpress.com, १४.१२.२०२०.

## नेमक्या बिबट्याची ओळख पटणार नसल्यामुळे तीन बिबटे कायमचे बंदिस्त

नाशिक जिल्ह्यातील दारणा खोरे परिसरातून पकडलेल्या बिबट्यांपैकी तीन नर केवळ हल्ले करणारा बिबट्या हा नर असल्याचे समजल्याने अद्याप बंदिस्त आहेत.

दारणा खोऱ्यात हल्ले करणाऱ्या बिबट्याला ओळखण्यासाठी घटनास्थळी व हल्ल्यातील व्यक्तींच्या जखमेतून जनुकीय नमुने घेऊन चाचणीसाठी हैदराबाद इथल्या सेंटर फॉर सेल्युलर एण्ड मॉलेक्युलर बायोलॉजी या प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. मात्र, त्या वेळी जनुकीय नमुने व्यवस्थित संकलित झाले नसल्याचे वन विभागाने सांगितले. त्यामुळे हल्ले करणारा नेमका बिबट्या समजणार नसल्याचे स्पष्ट करीत पकडलेल्या ११ पैकी तीन नर बिबट्यांना कायमस्वरुपी बंदिस्त ठेवण्याचा निर्णय वन विभागाने घेतला.

इगतपुरी तालुक्यात दीड ते दोन महिन्यांत बिबट्याच्या हल्ल्यांत तीन व्यक्तींचे मृत्यू झाले. त्यानंतर २४ नोव्हेंबर रोजी प्रौढ नर आणि एक डिसेंबर रोजी जेरबंद झालेली मादी पिंजऱ्यात आहेत.

इगतपुरीतील घटनांमधील जनुकीय नमुनेही त्याच प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. मात्र, या वेळी सर्व नमुने व्यवस्थित घेतल्याचा दावा वन विभागाने केला आहे. त्यामुळे प्रयोगशाळेच्या अहवालाधारे नेमका बिबट्या ओळखून त्याची रवानगी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील किंवा जुन्नर इथल्या केंद्रात केली जाणार असल्याचे वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी दिली.

**सूत्र** – 'भय इथले संपेना, नरभक्षी बिबट्या ठरेना', maharashtratimes.com, ०८.१२.२०२०.

## माणूस-बिबट्या संघर्षाच्या घटनांत वाढ

नाशिक, नगर, पुणे आणि मराठवाड्यातील बीडसह काही जिल्ह्यांमध्ये माणूस-बिबट्या संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. राज्यात बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये किमान १० व्यक्ती ठार आणि शंभराहून अधिक जखमी झाल्याची नोंद आहे.

पुणे जिल्ह्यात ऑक्टोबर नोव्हेंबर महिन्यांत १०० जणांवर बिबट्यांनी हल्ला केल्याची नोंद वन विभागाकडे आहे. बिबट्यांच्या हल्ल्यांत पाळीव जनावरेही ठार झाली आहेत. खेड, आंबेगाव, जुन्नर, शिरूर हे भाग ऊस शेतीमुळे बिबट्याप्रवण ठरले आहेत.

नाशिक जिल्ह्यातील नाशिक, इगतपुरी तालुक्यांसह पश्चिम वन विभागाच्या वनपरिक्षेत्रांत माणूस-बिबट्या संघर्षाचे प्रमाण कोविड-१९ ला आळा घालण्यासाठी लागू केलेल्या टाळेबंदीच्या काळापासून वाढल्याचे दिसून आले आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडे दारणा नदीकाठालगत असलेल्या हिंगणवेढे, दोनवाडे, बाभळेश्वर, सामनगाव, चेहेडी, पळसे या गावांमध्येही संघर्षात वाढ झाल्याचे वृत्त आहे.

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील म्हसदी, वसमार परिसरांत बिबट्याचा लक्षणीय वावर आहे.

बीड जिल्ह्यातील आष्टी, शिरूर व पाटोदा तालुका परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांत तीन व्यक्ती ठार झाल्या.

वाटेत अचानक माणूस आल्यामुळे स्वसंरक्षणासाठी, लहान मुले रात्री अंगणात खेळताना ती भक्ष्यासारखी भासल्याने बिबट्याने हल्ला केला अशा अपघाती हल्ल्यांच्या घटना आहेत. तसेच, माणसांचे रात्री शौचासाठी बाहेर पडणे, हे बिबट्यांचे हल्ले होण्यामागे एक कारण आहे, असे नाशिक विभागातील उपवनसंरक्षकांनी सांगितले.

**सूत्र** – 'राज्यभरात बिबट्यांचा धुमाकूळ; शेतावर भीतीचे सावट, ११ निष्पापांचा बळी', www.lokmat.com, ०२.१२.२०२०.


## माणूस-बिबट्या संघर्षविषयक संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| अकोला | पातूर | पिंपळखुट्यात विद्युत खांबाजवळ दोन बिबट्यांचे मृतदेह. | महाराष्ट्र टाइम्स, २५.१२.२०२० |
| | बाळापूर | पातूर-बाळापूर मार्गावर वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार. | लोकमत, ११.११.२०२० |
| अहमदनगर | आष्टी | बिबट्याच्या हल्ल्यांत दोन दिवसांत दोन व्यक्ती ठार. | लोकमत, २८.११.२०२० |
| | राहुरी | बिबट्याच्या हल्ल्यात दोन व्यक्ती व तीन गायी जखमी. | लोकमत, ०८.१२.२०२० |
| | संगमनेर | मादी बिबट्या जेरबंद. | लोकमत, १३.११.२०२० |
| | पाथर्डी | तालुक्यातून किमान तीन बिबटे जेरबंद. | लोकमत, ०५.१२.२०२० |
| औरंगाबाद | पैठण | बिबट्याच्या हल्ल्यात पिता-पुत्र ठार. | लोकसत्ता, १७.११.२०२० |
| गोंदिया | अर्जुनी मोरगाव | बिबट्याची शिकार करून कातडी, अवयवांची विक्री करणारे तिघे व त्यांच्या पाच साथीदारांना अटक. | ईसकाळ, १९.११.२०२०; ईसकाळ, २४.११.२०२० |
| | गोरेगाव | गोरेगाव वनपरिक्षेत्रात सलग दोन दिवसांत दोन बिबट्यांचे मृतदेह; शिकारीची शक्यता. | ईसकाळ, ०५.०१.२०२१ |
| नंदुरबार | तळोदा | बोरद शिवारात बिबट्या मृतावस्थेत. | लोकमत, ०२.१२.२०२० |
| | नवापूर | चिंचपाडा वनक्षेत्रात दोन बिबट्यांची शिकार. | ईसकाळ, २२.१२.२०२० |
| | साक्री | ठाणेपाड्यात बिबट्या मृतावस्थेत. | लोकमत, ०३.१२.२०२० |
| नाशिक | इगतपुरी | पिंपळगाव मोर परिसरात आठवडाभरात दोन बिबटे जेरबंद. | महाराष्ट्र टाइम्स, २५.११.२०२०; लोकसत्ता ०३.१२.२०२० |
| | बागलाण | वटार गावात वृद्धेवर बिबट्याचा हल्ला. | लोकमत, १५.१२.२०२० |
| | नाशिक | सारुळ गावात बिबट्या जेरबंद. | महाराष्ट्र टाइम्स, ११.११.२०२० |
| ठाणे | | येऊरच्या जंगलात पकडलेल्या जखमी बिबट्यावर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यजीव बचाव केंद्रात उपचार. | लोकमत, १६.१२.२०२० |
| बीड | आष्टी | बिबट्याच्या हल्ल्यात तीन व्यक्ती ठार, एक जखमी. | लोकसत्ता, ०४.१२.२०२० |
| रत्नागिरी | राजापूर | रायपाटण इथे पडक्या विहिरीत बिबट्याचे दोन मृत बछडे. | लोकमत, ३०.११.२०२० |
| | | करक गांगणवाडीत बिबट्याच्या हल्ल्यात दहा शेळया ठार. | ईसकाळ, ३१.१२.२०२० |
| | लांजा | विवली इथे वासरावर दिवसाढवळया बिबट्याचा हल्ला. | लोकमत, १७.१२.२०२० |
| रायगड | पनवेल | मृत बिबट्याचे मांस माणसांनी खाल्ले; कातडी, नखे, जबडा विकण्याचा बेत फसला. | लोकमत, १६.१२.२०२० |
| सोलापूर | करमाळा | माणसांवर हल्ले करणाऱ्या बिबट्याला वन विभागाने गोळ्या घालून ठार केले. | लोकसत्ता, १८.१२.२०२० |
| सांगली | शिराळा | कुसाईवाडीत बिबट्याच्या हल्ल्यात शेळी व कोकरे ठार. | लोकमत, ११.१२.२०२० |
| सिंधुदुर्ग | कणकवली | कासार्डे इथे विहिरीत पडून बिबट्याचा मृत्यू. | लोकमत, २०.११.२०२० |



## राष्ट्रीय बातम्या

### माळढोक वाचवण्यासाठी वीजवाहिन्या भूमिगत करण्याचा राष्ट्रीय हरित लवादाचा आदेश




माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड - GIB) पक्ष्याचे अस्तित्त्व असलेल्या राज्यांमध्ये वीज प्रकल्पांचे नूतनीकरण करताना सर्व वीजवाहिन्या भूमिगत असाव्यात, असा आदेश राष्ट्रीय हरित लवादा (NGT) ने दिला आहे. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने तसेच संबंधित राज्यांनी विद्यमान सौर आणि पवन ऊर्जा वाहिन्यांवर पक्ष्यांना परतवून लावणारे उपकरण चार महिन्यांच्या आत बसवण्याचे आदेशही लवादाने दिले आहेत.

माळढोक पक्ष्याच्या अधिवासाचा ऱ्हास व पक्ष्याची घटती संख्या या संदर्भात राष्ट्रीय हरित लवादाकडे दाखल याचिकेवर सुनावणी करताना लवादाने हा निकाल दिला.

राष्ट्रीय हरित लवादाने सप्टेंबर २०२० मध्ये माळढोक पक्ष्यांच्या संरक्षणासाठी उपाययोजनांबाबतच्या शिफारसी मागितल्या. त्यावर वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) ने भूमिगत वीजवाहिन्यांचा उपाय सुचविला होता.

दरम्यान, राष्ट्रीय हरित लवादाच्या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकारने राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा अभिप्राय मागविला होता. मात्र, त्याला सगळी संबंधित राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे उत्तर अद्याप आले नसल्याचे नोव्हेंबरच्या सुरुवातीला झालेल्या बैठकीत स्पष्ट झाले. केंद्रीय ऊर्जा मंत्रालय व राजस्थान सरकार यांच्यात ही बैठक झाली.

उच्च दाबाच्या वीजवाहिन्या जमिनीखालून नेण्याला मर्यादा असल्याचे मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले तर; राजस्थान वन विभागानेही या आदेशाची अंमलबजावणी करणे शक्य नसल्याचे सांगितले.

WII ने माळढोक पक्ष्याच्या संवर्धनासाठी संवेदनशील अधिवासाचा नकाशा तयार करून तो संबंधित मंत्रालये व महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश व कर्नाटक सरकारांना पुढील कार्यवाहीसाठी द्यावा, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

**सूत्र** – 'माळढोक संवर्धनासाठी आता वीजवाहिन्या भूमिगत', www.loksatta.com, ०२.०१.२०२१.
इशान कुकरेती. 'Bustard conservation: No agreement on underground power lines, ban on new projects', www.downtoearth.org.in, १५.१२.२०२०.

### वर्ष २०२० मध्ये भारतात १०५ वाघांचा मृत्यू

वर्ष २०२० मध्ये देशात १०५ वाघांचा मृत्यू झाल्याची माहिती राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने दिली आहे. मध्य प्रदेशात सर्वाधिक २९ व त्या पाठोपाठ महाराष्ट्रात १६ वाघांचे मृत्यू झाले. त्यानंतर कर्नाटकात १२, तमिळनाडू व उत्तर प्रदेशात प्रत्येकी आठ व्याघ्रमृत्यू झाले.

६४ वाघांचे मृत्यू देशातील विविध भागातील व्याघ्र प्रकल्प व संरक्षित भागात झाले आहेत. त्यात महाराष्ट्रातील १६ पैकी नऊ मृत्यूंचा समावेश आहे. गेल्या चार वर्षांत – २०१६ (१२१), २०१७ (११६), २०१८ (१०२) व २०१९ (९५) अशी देशातील वाघांच्या मृत्यूची आकडेवारी आहे.

**सूत्र** – पंकज मोहरीर. 'देशात १०५ वाघांचा मृत्यू; महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर', maharashtratimes.com, ०२.०१.२०२१.

### देशातील बिबट्यांच्या संख्येविषयीचा अहवाल प्रकाशित; महाराष्ट्रात १,६९० बिबटे

भारतात वाघांसोबतच बिबट्यांची गणना केली असून बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी 'स्टेटस ऑफ लेपर्ड इन इंडिया २०१८' हा अहवाल डिसेंबर २०२० मध्ये जाहीर केला. या अहवालानुसार, महाराष्ट्रात १,६९० बिबटे आहेत.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण आणि भारतीय वन्यजीव संस्था यांनी हा अहवाल तयार केला आहे. अहवालानुसार, वर्ष २०१४च्या तुलनेत २०१८ मध्ये देशात

बिबट्यांची संख्या ६० टक्क्यांनी वाढली आहे. २०१४ मध्ये ८,००० बिबटे होते; २०१८ मध्ये १२, ८५२ होते.

वाघांचा अधिवास असणाऱ्या संरक्षित वनक्षेत्रात आणि काही ठिकाणी शेतजमिनीवर ही गणना करण्यात आली. संरक्षित क्षेत्राशिवाय शेतशिवारात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांची एकूण संख्या गणनेत आढळलेल्या संख्येहून अधिक असण्याची शक्यता काही वन्यजीव तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्याचवेळी, बिबट्यांच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्नांअभावी व बिबट्यांच्या मृत्यूची वाढती संख्या लक्षात घेता या अहवालातील वाढलेल्या संख्येवर काही वन्यजीव अभ्यासकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. भारतात १९९८ मध्ये बिबट्यांची संख्या ४५ हजार इतकी होती तर; २०१५ मध्ये केवळ ७,९१० बिबटे होते. ही माहिती केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिली होती, या बाबीकडे अभ्यासकांनी लक्ष वेधले आहे.

बिबट्यांची राज्यनिहाय संख्या

| | |
|---|---|
| मध्यप्रदेश | ३, ४२१ |
| कर्नाटक | १, ७८३ |
| महाराष्ट्र | १, ६९० |
| कर्नाटक, तामिळनाडू, गोवा, केरळ | ३, ३८७ |
| उत्तरप्रदेश, उत्तराखंड, बिहार | १, २५३ |

महाराष्ट्र बिबट्यांच्या संख्येत तिसऱ्या क्रमांकावर असला तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी राज्यात बिबट्यांच्या मृत्यूची संख्या अधिक आहे. यावर्षी सुमारे १७५ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. बिबट्यांच्या माणसांवरील हल्ल्यातदेखील वाढ झाली आहे. एकट्या महाराष्ट्रात २०११ ते २०२० या कालावधीत ८५७ बिबट मृत्युमुखी पडले. २०१८ व २०१९ या दोन वर्षांत भारतात ८८६ बिबट मृत्युमुखी पडले. २०१८ या वर्षात ४६० बिबट्यांचा मृत्यू झाला. यातील ९० प्रकरणात बिबट्यांची शिकार झाली तर; २२ प्रकरणात गावकऱ्यांनी बिबट मारले. उर्वरित प्रकरणात मृत्यूचे कारण स्पष्ट नाही.

महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात बिबट्यांच्या संवर्धनासाठी स्वतंत्र धोरण आवश्यक आहे. संरक्षित क्षेत्राबाहेरील अधिवासातील बिबट्यांची संख्या लक्षात घेऊन वन्यजीव व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या सोळाव्या बैठकीत या दृष्टीने नियोजनाला सुरुवात झाली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या एका सदस्याने दिली.

**सूत्र** – 'देशात बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर', www.loksatta.com, २२.१२.२०२०.
'बिबट्यांच्या संख्येत खरीच वाढ?', www.loksatta.com, २३.१२.२०२०.

## गिधाडांच्या संवर्धनासाठी उपग्रह अंकन

केंद्र सरकारने गिधाडांच्या संरक्षण व संवर्धनासाठी कृती आराखडा जाहीर केल्यानंतर गुजरात वन विभागाने उपग्रहाधारित यंत्रणा वापरून सहा गिधाडांना अंकन केले. या गिधाडांमध्ये एक राजगिधाड (रेड-हेडेड वल्चर), दोन पांढऱ्या पाठीची (व्हाईट-रम्प्ड वल्चर) व तीन लांब चोचीची (इंडियन वल्चर) गिधाडे आहेत.

गिधाडांच्या संवर्धनासाठी त्यांचे भक्ष्य मिळविण्याचे क्षेत्र, वीणीच्या जागा, प्रवासाचा मार्ग या विषयी सखोल माहिती असणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन गिधाडांना उपग्रह अंकन करण्याचा निर्णय घेतल्याचे वन विभागाने सांगितले. गीर आणि महुवा क्षेत्रामध्ये सासण, गीर वन विभागाने तज्ज्ञांच्या मदतीने हा प्रकल्प राबविला.

भारतात आढळणाऱ्या गिधाडांच्या एकूण नऊ प्रजातींपैकी आठ प्रजाती गुजरातेत आहेत. पैकी चार स्थानिक व चार स्थलांतर करून येणाऱ्या प्रजाती आहेत. २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार गुजरातमध्ये पांढऱ्या पाठीची ३५२ व लांब चोचीची २८५ गिधाडे आहेत.

दरम्यान, ऑक्टोबर महिन्यात हरियाणातील पिंजोर इथल्या कृत्रिम प्रजनन केंद्रातील गिधाडांना अंकन करून नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले आहे. त्यांच्याही प्रवासाची माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे.



**सूत्र** – 'गिधाडांच्या प्रवासाचा मार्ग उलगडणार; सरकारचा वेगळा प्रयोग', maharashtratimes.com, २३.११.२०२०.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

### नेपाळ

**नेपाळमध्ये समुद्रसपाटीपासून ३,००० मी उंचीवर पहिल्यांदाच वाघ दिसला**

नेपाळमध्ये समुद्रसपाटीपासून ३,१६५ मी उंचीवर पहिल्यांदाच वाघ दिसून आला. एवढ्या उंचीवरील प्रदेशात या पूर्वी भुतानमध्ये (४,०३८ मी) आणि भारतातील अरुणाचल प्रदेशात दिबांग खोऱ्यात (३,६३० मी) वाघ दिसले होते. वाघाचा वावर उंचावरील प्रदेशात आढळू लागल्यामुळे जागतिक हवामान बदलाचे वन्यजीवांवरील परिणाम व वाघाच्या अधिवासाचा ऱ्हास या बाबी चिंताजनक असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

नेपाळच्या वन व मृदा संवर्धन आणि राष्ट्रीय उद्याने व वन्यजीव संवर्धन विभागांनी पूर्व नेपाळमध्ये समुद्रसपाटीपासून ३,१६५ मी उंचीवर नोव्हेंबर २०२० मध्ये दोन वेळा स्वयंचलित कॅमेऱ्यात वाघाची छबी आल्याचे सांगितले.

पूर्व नेपाळातील हा प्रदेश भारतातील सिक्क्कीममधील सिंगलिआ राष्ट्रीय उद्यान व पश्चिम बंगालच्या उत्तरेकडील दूअर्स अधिवासांना जोडत असल्याने या प्रदेशाच्या संवर्धनाकडे विशेष लक्ष देण्याची गरज दोन विभागांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या पत्रकात व्यक्त केली आहे.

नेपाळमध्ये २००९ साली १२१, २०१६ मध्ये १९८ आणि २०१८ साली २३५ वाघ असल्याच्या नोंदी आहेत. व्याघ्र अधिवास असलेल्या १३ देशांसह नेपाळनेही २०२२ पर्यंत देशातील वाघांची संख्या दुपटीने वाढवण्याचा करार स्वीकारला आहे.




**सूत्र** – 'Royal Bengal Tiger spotted at a height of 3,165 m above sea level in Nepal, raising concerns about impact of global warming', www.thefinancialexpress.com, १२.१२.२०२०.

### श्रीलंका

**श्रीलंकेत जगातील सर्वाधिक हत्तीमृत्यू**

श्रीलंकेच्या सार्वजनिक लेखा समितीने माणूस-हत्ती संघर्षाचे विशेष लेखापरीक्षण करण्याचा आदेश दिला आहे. तिथल्या संवर्धन आणि संशोधन केंद्राचे प्रमुख व हत्ती तज्ञ डॉ. पृथ्वीराज फर्नांडो यांनी हे लेखापरीक्षण करावे, असे समितीने म्हटले आहे.

सार्वजनिक लेखा समितीच्या अलीकडे झालेल्या बैठकीत दोन बाबी समोर आल्या त्या अशा की माणूस-हत्ती संघर्षात जगात भारतापाठोपाठ श्रीलंकेत सर्वाधिक माणसे ठार झाली तर हत्तींच्या मृत्यूंची संख्या श्रीलंकेत सर्वाधिक आहे. वर्ष २०२० मध्ये श्रीलंकेत ४०७ हत्ती मृत्युमुखी पडले. या आधी हत्तीमृत्यूची वार्षिक सरासरी २७२ होती. मृत्युमुखी पडलेल्या माणसांची वार्षिक सरासरी ८५ होती ती वाढून १२२ झाली आहे.

ही आकडेवारी पाहता, समितीने माणूस-हत्ती संघर्षाला आळा घालण्यासाठी वन्यजीव विभागाने इतर संबंधित विभागांच्या सहकार्याने अधिक परिणामकारक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली व त्याकरता राष्ट्रीय समन्वय समिती स्थापन करण्याचे आदेश वन्यजीव विभागाला दिले.

वर्ष २०१६ पासून माणूस-हत्ती संघर्ष टाळण्यासाठी देशात ४,२११ किमी लांबीचे कुंपण घातले. परंतु, देखभालीअभावी ते लवकरच निष्प्रभ ठरल्याचे निरीक्षण सार्वजनिक लेखापरीक्षण समितीने नोंदविले. कुंपणाच्या देखभालीसाठी वर्षाला ८६ लाख रुपये खर्च केला जात असला तरी वन्यजीव विभागाने त्याची देखभाल नीट होते आहे हे दररोज पाहिले पाहिजे, असे समितीने म्हटले आहे.

कुंपणाच्या बांधकाम ठिकठिकाणी जनावरोधाने बंद पडले कारण हे कुंपण म्हणजे लोकांच्या जमिनीच्या सीमा ठरविण्यासाठी घातल्याचा लोकांचा गैरसमज झाला, या मुद्द्यावरही बैठकीत चर्चा झाली.

**सूत्र** – 'Sri Lanka records highest elephant deaths in world', www.hindustantimes.com, १३.१२.२०२०.



## या नव्या बातमीपत्राविषयी

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र' या वन्यजीवविषयक त्रैमासिक बातमीपत्राची संकल्पना 'पीए अपडेट' अर्थात 'प्रोटेक्टेड एरिआ अपडेट' या इंग्रजी द्वैमासिक बातमीपत्रावर आधारलेली आहे. 'कल्पवृक्ष' ही बिगर-सरकारी संस्था गेली २५ वर्षे सातत्याने 'पीए अपडेट' प्रकाशित करत आहे. हे नवे त्रैमासिकही 'कल्पवृक्ष'च्या पुढाकाराने सुरू होत आहे.

प्रोटेक्टेड एरिआज् म्हणजे १९७२ च्या वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत अधिसूचित केलेली संरक्षित क्षेत्रे; त्यामध्ये वन्यजीव अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प, संवर्धन राखीव क्षेत्रे, लोकसमूहाची राखीव क्षेत्रे यांचा समावेश होतो. भारतीय उपखंडातील संरक्षित क्षेत्रांशी संबधित घटना जसे की या क्षेत्रांची निर्मिती किंवा पुनर्रचना, त्यांच्या संरक्षण, संवर्धनात येणाऱ्या अडीअडचणी, आव्हाने, या क्षेत्रांवर बरेवाईट परिणाम करू शकतील असे धोरणात्मक निर्णय, वन्यजीवविषयक अभ्यास, संशोधन याविषयी प्रामुख्याने इंग्रजीतील काही दैनिकांत (अलीकडे त्यांच्या संकेतस्थळांवर) प्रकाशित झालेल्या निवडक बातम्यांचे संकलन व त्यांवर संपादनाचे सोपस्कार करून प्रत्येक बातमीच्या मूळ प्रकाशनाचा स्रोत देऊन त्या 'पीए अपडेट'मध्ये दिल्या जातात.

वन्यजीवविषयक अभ्यासक, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, वनाधिकारी व कर्मचारी आणि पर्यावरण, वन्यजीव व आदिवासी-हित विषयक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांचा 'पीए अपडेट'च्या वाचकवर्गात समावेश आहे. 'पीए अपडेट' इंग्रजी भाषेत असल्यामुळे त्याला इतर प्रादेशिक भाषकांपर्यंत, विशेषतः भारतातील संरक्षित क्षेत्रांजवळ राहणाऱ्या वाचकांपर्यंत पोहोचण्यात भाषेची मर्यादा आड येते. संरक्षित क्षेत्रांच्या परिसरात, जवळपास राहणारे बहुसंख्य लोक हे प्रादेशिक भाषक आहेत. संरक्षित क्षेत्रांमध्ये दररोज फिरून काम करणारा वन विभागाचा बहुसंख्य कर्मचारी वर्ग हा प्रादेशिक भाषक आहे. आजच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीवर संरक्षित क्षेत्रांचे महत्त्व, त्यांच्या समोरील आव्हाने संरक्षित क्षेत्रांशी थेट व जवळून संबंधित असलेल्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रादेशिक भाषांना पर्याय नाही. या जाणिवेतून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांशी संबंधित बातम्यांचे 'पीए अपडेट'सारखे बातमीपत्र मराठी भाषेत प्रकाशित करण्याचे 'कल्पवृक्ष'ने ठरवले आहे.

मराठी व इंग्रजी वृत्तपत्रे, नियतकालिके यामध्ये प्रकाशित झालेल्या महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांशी संबंधित निवडक बातम्या संकलन, संपादन करून 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त दिल्या जाणार आहेत. प्रत्येक बातमीबरोबर तिच्या मूळ प्रकाशनाचा स्रोत त्यात दिला जाणार आहे.

'पीए अपडेट' आणि प्रस्तुत मराठी बातमीपत्र ही दोन्ही परिपूर्ण नाहीत, याची आम्हाला जाणीव आहे. खेरीज, एकदा प्रकाशित झालेल्या बातम्या पुन्हा देण्याचे प्रयोजन काय, असा प्रश्न वाचकांना पडू शकतो. या बातमीपत्रांचा हेतू असा की वन्यजीवांसाठी संरक्षित क्षेत्रातील घडामोडींविषयी बातम्या एकत्र पाहण्याचा पर्याय उपलब्ध असावा. तसेच, इंग्रजीतील बातमीपत्र जवळपास दोन दशके सातत्याने प्रकाशित होत असल्यामुळे या काळात इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये संरक्षित क्षेत्रांविषयीचे वृत्तांकन कसे होते, त्यात काही बदल झाले का याचे दस्तावेजीकरण आपोआपच या बातमीपत्राच्या रुपाने उपलब्ध झाले आहे. तसे, महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांविषयीच्या वृत्तांकनाचेही व्हावे, अशी अपेक्षा आहे. मुख्य म्हणजे, ही सुरुवात आहे. वन्यजीव संरक्षणाबाबत अशी बातमीपत्रे जास्तीत जास्त प्रादेशिक भाषांमध्ये प्रकाशित झाली तर हवी आहेतच.

तेव्हा, 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र' कसे वाटले या विषयी तुमचा अभिप्राय, मते, सूचना आम्हाला जरूर कळवा. तुमच्या संपर्कातील विद्यार्थी, शिक्षक, वार्ताहर, पर्यावरण-वन्यजीव प्रेमी व या विषयात रुची असणारे इतर वाचक, कार्यकर्ते, संरक्षित क्षेत्रांच्या परिसरातील विद्यार्थी, वाचक व इतर रहिवासी यांच्यापर्यंत हे बातमीपत्र पोहोचावे, असे तुम्हाला वाटत असेल तर त्या सर्वांचे ईमेल, पत्ते आणि संपर्क क्रमांक आम्हाला पाठवा.

**अधिक माहिती व संपर्कासाठीः**

महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र
c/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा,
९०८, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.
फॅक्सः ०२० २५६५४२३९.
ई-मेलःmarathipaupdate@gmail.com


***

NOW AVAILABLE

## The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra

News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by
Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books




**Contents:**


**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*

**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -_A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (Shiba Desor); 4) Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)


ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line drawings by Ashvini Menon

For copies at 20% discount write to psekhsaria@gmail.com

## महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र सवलत योजना

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'ची वार्षिक वर्गणी रुपये १५०/- भरा आणि
'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' हे महाराष्ट्रातील वन्यजीवविषयक बातम्या व माहितीचे संकलन असलेले पुस्तक निम्म्या किमतीत मिळवा.

किंवा

रुपये ३५०/- भरा आणि 'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' पुस्तकासह आणि 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र' किंवा 'Protected Area Update' यापैकी एक वार्तापत्राचे वर्षभराचे सदस्यत्व घ्या.

'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' या पुस्तकाविषयी अधिक माहितीसाठी वरील चौकट पाहा.

पुस्तकाच्या परीक्षणासाठी पाहा -
(मराठी) https://marathi.thewire.in/author/parikshit-suryavanshi (लेखक - परीक्षित सूर्यवंशी)
(इंग्रजी) https://india.mongabay.com/2020/06/book-review-good-information-data-and-peoples-support-is-needed-for-conservation/ (लेखक – असद रहमानी)

अधिक माहितीसाठी संपर्क psekhsaria@gmail.com

## दृष्टीकोन

### संरक्षित क्षेत्राबाहेरील वने – संशोधन व वन्यजीव संरक्षण

वने म्हटली की डोळ्यासमोर उभी राहतात ती अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने. मात्र त्यातील परिसंस्थांसारख्याच परिसंस्था अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने म्हणजे संरक्षित क्षेत्रांच्या सीमेबाहेरही असतात. त्यांना संरक्षित क्षेत्राबाहेरील वन असे म्हटले जाते. ही संरक्षित क्षेत्राबाहेरील वने सूक्ष्म जीवांपासून मोठ्या प्राण्यांना आश्रय देतात; त्याचबरोबर वेगवेगळ्या संरक्षित क्षेत्रांना एकमेकांशी जोडण्याचे काम करतात. या जोडमार्गांना वन्यजीवांचे भ्रमणपट्टे (wildlife corridors) म्हणतात.

महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी वन विभाग हा संरक्षित क्षेत्राबाहेरील वनांपैकी एक आहे. हा भाग ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, नवेगाव नागझिरा अभयारण्य, बोर व्याघ्र प्रकल्प आणि उमरेड कऱ्हांडला अभयारण्य या संरक्षित क्षेत्रांना एकमेकांशी जोडतो. त्यामुळे वाघांचे नैसर्गिकरित्या स्थलांतर शक्य होते आणि त्यांच्या संख्येत संतुलन राखण्यास मदत होते.

'वाईल्डलाइफ कॉन्झर्वेशन ट्रस्ट' (WCT) ही संस्था १६० संरक्षित क्षेत्रे व संरक्षित क्षेत्राबाहेरील वनांमध्ये शासनासोबत काम करीत आहे. संरक्षित क्षेत्राबाहेरील वनांमध्ये संशोधन करणे आव्हानात्मक असते. कॅमेऱ्यांची चोरी, तोडफोड, मानवनिर्मित आगींमुळे अनेक वेळा नुकसान होते.

मात्र, संरक्षित क्षेत्राबाहेरील संशोधनामुळे त्या परिसराची माहिती मिळते. वन्यप्राण्यांच्या अभ्यासासाठी लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यांमध्ये माणसांची, गुरा-ढोरांसह पाळीव प्राण्यांची छायाचित्रेसुद्धा घेतली जातात. त्यामुळे जंगलावरील मानवी हस्तक्षेपाचे परिणाम अभ्यासणे शक्य होते. मांसाहारी वन्यप्राण्यांच्या विष्ठेचे नमुने अभ्यासून त्यांच्या भक्ष्य प्रजातींचा अंदाज बांधता येतो; हे प्राणी खाद्यासाठी जंगलातील प्रजातींवर किती व पशुधनावर किती प्रमाणात अवलंबून आहेत याचा अभ्यास करता येतो. वन्यप्राण्यांचे स्थानांतरण, मानवी हस्तक्षेप आदी घटकांचा अभ्यास करून नियोजनाची क्षमता निर्माण होते.

संरक्षित क्षेत्राबाहेरील वनांमध्ये जळाऊ लाकूड व इतर गोष्टींसाठी माणसे वावरतात, शेती व जंगले एकमेकाला लागून असतात. त्यामुळे माणूस व वन्यप्राण्यांच्या अचानक सामोरे येण्याने संघर्षमय प्रसंगांची शक्यता वाढते. WCT ने मोबाईल फोनच्या तंत्रज्ञानावर आधारित स्वयंचलित कॅमेरे जंगल व भोवतालच्या गावांच्या सीमेवर लावले, या कॅमेऱ्यांनी घेतलेली छायाचित्रे त्वरित मोबाईल फोनवर पाहता येतात. वन्यप्राणी गावाकडे जात असल्याचे दिसल्यास वन विभागाला कळवून आवश्यक काळजी घेता येऊ शकते.

तृणभक्षी प्राण्यांमुळे पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. अशा नुकसानाला आळा एक प्रयत्न म्हणून विशिष्ट प्रकारचे सौरऊर्जेवर चालणारे लहान दिवे मोठ्या संख्येने लावण्यात आले; हे दिवे अंधारात चमकतात. त्यामुळे काही प्रमाणात तृणभक्षी प्राण्यांना शेतात येण्यापासून रोखता येते.

संरक्षित क्षेत्राबाहेरील वनांमध्ये मुख्यतः लाकूड उत्पादन, रोपवन असे उपक्रम राबविले जातात. परिणामी नैसर्गिक अधिवास नष्ट होण्याच्या शक्यता वाढतात. खेरीज, विविध जबाबदाऱ्या व अपुऱ्या संसाधनांमुळे वन संरक्षणाला कायमच प्रथम प्राधान्य दिले जात नाही.

भारतातील बहुतांश संरक्षित क्षेत्रे ही आकाराने लहान असल्याने त्यांत भौगोलिक व पारिस्थितिकीच्या दृष्टीने दीर्घ काळापर्यंत वाघांची संख्या संतुलित ठेवणे कठीण आहे. जन्मानंतर जवळपास दोन वर्षांनी वाघ आईपासून वेगळा होऊन स्वतःचे क्षेत्र निवडण्यासाठी, जोडीदाराच्या शोधात भ्रमंतीला सुरुवात करतात. अशा वेळी स्थलांतरादरम्यान वाघ प्रसंगी शेकडो किमी अंतर चालून जातात, हे लक्षात घेता संरक्षित क्षेत्रांबाहेरील वनांच्या संरक्षणाची गरज अधोरेखित होते.

- **विक्रांत वानखडे**

(लेखक 'वाईल्डलाइफ कॉन्झर्वेशन ट्रस्ट' या संस्थेत कार्यरत आहेत.)

ई-मेलः vikrantw@wctindia.org

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004